श्री

स्वरव्यं

व्यवस्था

लेखक व प्रकाशक

वे. पांडुरंग जनार्दन पाध्ये

मुकाम आगाशी

मुंबईत.

१०, कांदेवाडी येथें श्री विठ्ठल प्रेसमध्यें

पी. विठ्ठलराव यांनीं छापिलें

नवेंबर सन १९११ इ.

आवृत्ति पहिली. प्रति १०००

किंमत आठ आणे.

[illegible]

[illegible]

[illegible]

श्री.

स्वरव्यंजन व्यवस्था

लेखक व प्रकाशक
वे. पांडुरंग जनार्दन पाध्ये.
मुक्काम-आगाशी.
यांनीं

मुंबईत.
"विठ्ठल प्रेसांत छापून प्रसिद्ध केलें."

सन १९११ इ.
आवृत्ति पहिली.
किंमत आठ आणे.

वै० पांडुरंग जनार्दन पाध्ये मु० आगाशी.
उमर वर्षे ७०



प्रस्तावना.

वे. रा. रा. पांडुरंग जनार्दन भट्टजी पाध्ये आ-
गाशीकर यांचा हा पुढील प्रयत्न मराठी भाषे-
च्या दृष्टीनें केवळ अपूर्व आहे. अितर भाषां-
त अुच्चारा प्रमाणें अक्षर घटना व अक्षर
वटिका नसते व अक्षर घटने प्रमाणें व वटिके
प्रमाणें अुच्चार होत नाहीं. कोठें व्यंजना च्या
लोप होतो तर कोठें अनुल्लेखित व्यंजनाचा व
स्वराचा अुच्चार होतो. आमच्या संस्कृत भा-
षेंत मात्र तसा प्रकार नाहीं असा आह्मास मोठा गर्व होता त्या-
गर्वाच्या निरास द्वारा अेतदर्थ परमेश्वरी
अिच्छेनें पूर्वोक्त पाध्ये वैदिकांचा अवतार
झाला आहे यांच्या कडून हें काम कसें होतें
विचार दृष्टीला व लौकीक दृष्टीला तें किती संम
त होतें हें अद्यापि पाहणें आहे. पाध्ये यांच्या
या विषयावरील व्यासंग निदान २५ वर्षें आहे
व इतक्या अवधींत पाध्ये यांनी या रुक्ष वाट-
णाऱ्या विषयाची जुन्या व नव्या साक्षर पंडि-
तांस माहिती देअून पुष्कळ संमती पत्रें हि
मिळविलीं आहेत. याच्या मता प्रमाणें २ अ
३ आ (ऋ ॠ व ऌ ॡ यांतील ऱ् व ऌ् टाकून

बाकी राहिलेले) ऋ ॠ व बाकीचे मिळून सोळा स्वर होतात. व अक्षरांच्या बारा खड्या जाऊन सोळा खड्या होतात संस्कृत च व प्राकृत (मराठी) च हीं निराळीं व्यंजनें आहेत. व त्याचप्रमाणें आणखीहि अेक प्रकारचा च्च पाध्यानीं शोधून काढला आहे. त्याला ते महाप्राकृत चवर्ग ह्मणतात. व त्याचा लेख च असा करतात. अ चा अुच्चार चुकला आहे निः×कृति याचा संधि निर्कृती असा नसून तो संधि नियमानें रेफ न देतां (पाध्ये निर्‍ती असा लिहितात.) तत सवितुः याचा संधि तच्छवितुः असा लिहिला पाहिजे. संज्ञा याचा अुच्चार सर्वथा चुकला आहे. अित्यादि विषय व अेकोणतीस २९ न ह्मणतां नववातीस नसेच अडतीस ३९ न अुनीस नव्याण्णव प्रमाणें ह्मणावें. ही सूचना या सर्वांचा विचार सर्व भाषाकोविदानीं अवश्य करावा. असें या अल्प ग्रंथाचें मोटें महत्व आहे. आणखीही कांहीं त्यांच्या मतें चुकलेल्या त्यानीं लोकांपुढें मांडलेल्या आहेत त्या अनुक्रमणे वरून सहज लक्षांत येतील. अैकमत्य झालें तर या विषयाचे पुरस्कर्ते पाध्ये यानां आनंदच होअील. पण प्राचीन व अर्वाचीन पंडित

या पाध्यांचा ह्मणण्याचा मनन पूर्वक विचार करूं लागतील तरी हि त्यांस आपल्या श्रमाचें सार्थक झालें असें वाटेल. मला स्वतःला पाध्ये यांचे ऋ ॠ ऌ ॡ संबंधीं विचार संमत आहेत. ज्ञ चा अुच्चारा संबंधीं वेदमूर्तीची मीमांसा ठीक आहे. अुच्चार व लेखन यांची अेकवाक्यता असावी हा पाध्यांचा विचार सर्व ग्राह्य व्हावा असें वाटतें. रा. पाध्ये संस्कृत ज आणि प्राकृत ज्य यांचा अुच्चारामध्यें फरक करीत नाहींत असा माझा समज झाला आहे माझा समजुतीनें ज हें अेकाक्षर आहे व ज्य हें ज्य हें जोडाक्षर आहे. जसें आपण त्याला ह्मणतों त्या प्रमाणें ज्याला ह्मटलें पाहिजे. जन्म यांतील ज व ज्याला यांतील ज्य चा अुच्चार यांचें तादात्म्य नाहीं असा असें माझा समजुतीस वाटतें असे विषय फारच थोडे आहेत. अेकंदरीनें वे. रा. पाध्ये यांनी काळजी पूर्वक सिध्द केलेल्या चिंत्य विषयाचा विचार करण्याची सर्व पंडितांस व्हावी अशी आज्ञा करून वे. रा. रा. पांडुरंग जनार्दन पाध्ये व सर्व पंडित यांचा दरम्यान जो माझा आड पडदा आहे तो आढून घेऊन लेखक वाचकांची गांठ पडेल असें करितों.

चिंतामण गंगाधर भानु. पुणें. ता. ३।१।१९११

अभिप्राय नंबर १.

वे. शा. सं. रा. रा. पांडुरंग जनार्दन पाध्ये नातु गुर्जर मुक्काम आगाशी. हे हल्लीं गंगा स्नाना करितां येथें आले असून येथील शाळा पहाण्या करितां गेले होते त्या वेळीं, त्यांणीं वर्णोच्चारा संबंधें व लिपी संबधें स्वतः बसविलेली कल्पना आह्माला दाखविली ती फारच संयुक्तिक असून अनुभव सिद्ध आहे. आतां ही जरीं पाणिनी शास्त्र विरुध आहे. तरी अनुभव सिध्द गोष्टीचा अपलाप करणें हें योग्य नाहीं. करितां यांचें संयुक्तिक बोलणें आह्मांस बरे वाटतें. तसेच हे अुत्तमोत्तम वैदिक असून याज्ञिकांत यांचा शोध फारच आहे. आश्वलायन गृह्यसूत्र वृत्ती वरून चक्षुषी व निरवाप लोकांत चालू असलेल्या व्यवहारा पेक्षां हे ह्मणतात तो विरुध सा वाटतो तथापि तो सूत्रा पासून स्वरसतः निघतो असें आह्मांस वाटतें. कित्येकांचे मतें अश्रुमुख पितराला नांदीमुख संज्ञा देअून त्यांचेंच नांदी श्राद्ध करावें असें ह्मणणें आहे. परंतु तें भट्टीचा अर्थ यांणीं

करून दाखविल्या वरून प्रोष्ठपदीचा पितरांचें च नांदी श्राध्द करावें असें दिसतें व तें संयुक्तिक आहे. यांचा आणखीही कल्पना व्यवहारामध्यें फारच योग्य आहेत् त्यापैकीं कांहीं आम्ही पाहिल्या. ते येथें एकाकीं आल्या कारणानें व त्यांचा जवळ येथें साहित्य नसल्या कारणानें तो योग कांहीं आला नाहीं तथापि हे बुध्दिवान् व कल्पक आहेत हें निष्पक्षपात सिध्द होतें. भाषादिकहि कल्पना बऱ्याच आहेत. विस्तार भयास्तव फार लिहित नाहीं.

शके १८२४ वैशाख शुध्द २ भृगुवार.

दत्तात्रेय वासुदेव शास्त्री निगुडकर.

मुक्काम - राजापूर.

अभिप्राय नंबर २

वे. शा. रा. रा. पांडुरंग शास्त्री तात्या आगाशीकर हे हल्लीं राजापुरीं आले व त्यांनीं स्वर व्यंजन संबंधीं बराच झालेला घोटाळा दाखवला व तो यथावत व्यवस्थित करूनहि दाखवला. वर्णोच्चार पुष्कळ ठिकाणीं चुकलेले आहेत. ही खात्री करून देऊन ते कसे केले पाहिजेत् हें हि दाखवलें तें आम्हाला योग्य वाटलें. तसेंच धर्मशास्त्र व याज्ञीक संबंधानेंहि बरेच विचार सांगितले ते बरे अ-

सून संग्रह करण्यास योग्य आहेत असें आह्मा-
स वाटतें. अग्नौकरणास स्वाहाकाराचा विकल्प
सूत्रांत आहे तो धर्म सिंधूंत विधुरा विषयीं सांगि-
तला पण तो योग्य नसून नांदी श्राद्ध विषयक आ-
हे. असें ह्यांचें ह्मणणें सयुक्तिक दिसतें. तसेंच नि-
र्वाप व चक्षुषी विषयीं वृत्ती विरुध ह्यांनी सांगि-
तलें पण तें सूत्रावरून स्पष्ट होतें. चतुर्थी प्रथमेया-
मे० यांचा अर्थ व्यवहारा विरुध यांनीं सांगित
ला. पण तो सशास्त्र दाखवला. तो आह्मालाबरा
वाटला. शके १८२४ वैशाख शुद्ध २ भृगुवार.

कृष्णशास्त्री नवरे. मुक्काम- राजापूर.

अभिप्राय नंबर ३

वे. रा. श्रीयुत पांडुरंग जनार्दन पाध्ये राहणार आ-
गाशी जि० ठाणे. हे सर्वोत्तम वेद पाठक असून
पुष्कळ वेद वाक्यांचा भावार्थ हि जाणतात यां-
स शास्त्रीय ग्रंथांत किंवा लोक व्यवहारांत शास्त्र
दृष्टीनें किंवा व्यवहार दृष्टीनें जेथें अव्यवस्था दिसते
तेथंती दूर करण्याकडे ह्यांचें फार लक्ष लागलें अ-
सून लोकांच्या असूयेस न जुमानता नमा प्रयत्न
सर्वदा करीत असतात. ह्यांचे बुद्धी सर्वत्र
वैदिकांत न दिसणारें कल्पना चातुर्य फार वरण-
नीय आहे. ह्यांनीं स्वाभि प्रायानुरूप असे पुस्तक

रूपानें लिहिलेले कांहीं भाग मला दाखविले. त्यांतील कित्येक संयुक्तिक व शास्त्र संमत आहेत् ते सर्व विद्वज्जनांस मान्य होतीलच. पण जे कांहीं केवळ संयुक्तिकच आहेत ते सुद्धां नुसत्या अयुक्तिक शास्त्र सप्रमाण भूत न मानणाऱ्या अशा अर्वाचीन विद्वानांस पसंत पडण्यास हरकत नाहीं. अकंदरींत ह्यांचा प्रयत्न फार स्तुत्य असून तो लोकादरास पात्र आहे ह्यांत संशय नाहीं. आदीं वार्धक्य त्यांत श्वास कासोपद्रव आणि त्यांतही चक्षु श्रोत्र दशनादि वैकल्य असें असतां अति कठीण असा सांग वेद पाठ राखणें व युक्तायुक्त संबंधानें श्रौत स्मार्त कर्मातील सूक्ष्म दृष्टीनें विचार करणें ह्मणजे हें लोकोत्तरत्व प्रदर्शक आहे. करितां अशा विचारी वेद पुरुषास सर्व प्रकारें साह्य करणें हें अति प्रशस्य व परम पवित्र कर्तव्य आहे. असें मला वाटतें कळावें. मिति चैत्र कृष्ण ५ शके १८२९

आत्मारामशास्त्रीपित्र्ये, रहाणार कोल्हापूर.

ताजाकलम- ह्या सदरील विद्वत् पुरुषास श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमत् द्वारका शारदा पीठाधीश्वर श्रीमन्माधव तीर्थ स्वामींनीं त्यांची कर्मकांडा संबंधी विचार सरणी पाहून (कर्मकांडकोविद) अशी सत्पदवी दिलेली आहे. आणि त्यांचे गुणा विषयीं इतर विद्वानांनीं पौरोभाग्य दर्शवावें हें मोठें आश्चर्य आहे. इत्यलं ॥ सही सदर पित्र्ये.

वे. रा. पाध्ये यांजपाशीं कांहीं विषयां संबंधानें मी आज वाटाघाट केली. त्याजवरून वे. शा. रा. पित्र्ये यांनीं लिहिलेला अभिप्राय मला संमत आहे. चैत्र कृ. ८ श. १८२९ वि. ब. मारवेल कोल्हापूर.

अभिप्राय नं० ४

वे. शा. रा. रा. पांडुरंग जनार्दन पाध्ये गुर्जर शास्त्रीबोवा यांसि- आपण संस्कृत व मराठी भाषेंत प्रचलित असलेल्या वर्ण मालेंत (अक्षरमालेंत) लेखांत व उच्चारांत कांहीं दोष आहेत ते दाखविण्या संबंधानें लिहिलेला लेख मजकडे वाचावया करितां पाठविला तो वाचून पाहिला. अेकंदरींत मला वाटतें आपण या विषया संबंधानें बरेच परिश्रम करून हा लेख लिहिला आहे. व त्यांत श्रध्धेपेक्षां तर्काचा विशेष अवलंब केला आहे. तेव्हां जी गोष्ट सांप्रतचा प्राचीन लोकांत विशेषतः वैदिक लोकांत क्वचित दृष्टि पडते. ती गोष्ट म्हणजे मीमांसा पध्धती ही आपल्या लेखांत विशेष दृष्टी पडते हें पाहून मला फार आनंद होत आहे. आपल्या विचारांतील कांहीं मुद्या संबंधानें माझा मतभेद आहे. अुदाहरणार्थ- ऋ ऌ हीं आपण व्यंजनें मानतां प्राचीन पंडितानीं हे स्वर मानले आहेत अुच्चारांत जरी ते व्यंजना प्रमाणें भासतात तथापि त्यांचे संधी पाहूं गेलें असतां स्वर वर्गा प्रमाणें होतात. तेव्हां अुच्चारास महत्व देअून त्यास व्यंजन मानावें का ते स्वर कार्य करीत आहेत म्हणून त्यास स्वर मानावें. असा प्रश्न येतोव त्यामुळें प्राची-

न अृषीनीं जें त्यांचें स्वरांत परिगणन केलें आहे तें चुकीचेंच आहे. असें वाटत नाहीं. असो या प्रमाणें मत भेदाच्या कांहीं बाबी आहेत. तथापि आपला लेख एकवेळ वाचण्या सारखा व विचारणीय आहे. लिपिसंबंधानें जे आपण दोष दिले आहेत त्या संबंधानें मला कांहीं सांगावयाचें नाहीं. परंतु लिपी सप्रमाण धरून अुच्चार करावेत असें आपण अेके ठिकाणी सांगितलें आहे तें मात्र युक्त नाहीं कारण लिपींत हजारों फेर बदल झालेले आहेत अुच्चारण विधिशास्त्र जसें शिक्षा तसें लिपिशास्त्र प्रसिद्ध नाहीं पूर्वीच्या लिपींत व प्रस्तुतच्या लिपींत हजारों फरक झाले आहेत तेव्हां अुच्चारास प्राधान्य देअून विचार करावा हें बरें दिसतें या दृष्टिनें विचार केला असतां लेखासंबंधानें जे आपण दोष दाखविले आहेत त्यांवर अितका कटाक्ष ठेवण्याचें कारण दिसत नाहीं. माझ्यामतें आपल्या लेखांत थोडासा विनोद जास्त दिसतो लिपीसारख्या नीरस विषयाला तो अवश्य आहे ही गोष्ट खरी आहे. तथापि मूळ मुद्यापेक्षां त्याचाच विस्तार फार झाला आहे. तो कमी केला तर लेख बराच आटोपशीर होअील असें वाटतें. असो वावर सांगितलेल्या गोष्टीकडे आपण लक्ष द्यावें व परिश्रम करून लिहिलेला आपला निबंध छापून लोकांस त्याचा फायदा द्यावा.

आ० रंगाचार्य बा० रड्डी मुंबई

अभिप्राय नं० ५

वे. शा. रा. रा. पांडुरंग जनार्दन पाध्ये यानीं तयार केलेल्या हस्तलिखित पुस्तकांतील बराच भाग मी समजून घेतला. त्यांत स्वर व व्यंजन यांची अुपपत्ती व प्रक्रिया फार मार्मीक रीतीनें प्रतिपादित केलेली आहे. स्वर मूळचे कोणचे होते व विशेषतः त्यांत ऋ ॠ ऌ ॡ कसे प्रतिविष्ट झाले याचें विवरण फार खुबीदार केलेलें आहे. त्यांचा मुख्य कटाक्ष असा आहे कीं, व्यंजना प्रमाणें अची बारा खडी होती. व नंतर तिचें मूळ स्वरूप जाअून स्वराचे भिन्न भिन्न आकार झाले. तसेंच व्यंजना मध्यें अची अुपपत्तीहि फार विलक्षण रीतिनें केलेली आहे. सारांश या ग्रंथांत ठिकठिकाणीं येणाऱ्या कल्पना चित्त वेधक आहेत. ग्रंथ करते हे वेदांत पारंगत असून त्याणी अध्ययन व अध्यापन घरांत केलेलें आहे. व त्यांतच त्यांचा आयुष्क्रम झालेला आहे. त्यांत त्यांनीं असा ग्रंथ तयार केला आहे हें त्यांस फार भूषणावह आहे.

पुणें. ता. १९ नोव्हेंबर.

१ रा. लक्ष्मण मोरेश्वर देशपांडे बी. ओ.
१ रा. गणेश जनार्दन आगाशे. बी. ओ.
१ रा. काशिनाथ नारायण साने पापडीकर.

रा. रा. प्रोफेसर दामोदर गणेश यांचा अभिप्रायः—

वे ॥ शा ॥ रा. रा. पांडुरंग जनार्दन पाध्ये अगाशीकर शास्त्री यांनीं लीहिलेल्या (स्वर व्यंजन व्यवस्था) ह्या ग्रंथाची हस्त लिखीत प्रत मजला दिली होती ती वाचली ग्रंथांत सांप्रत प्रचलित असलेल्या स्वर व्यंजन व्यवस्थेवर व लेखन पद्धतीवर जोरदार सुव्यवस्थित व विचार स्वातंत्र्य दर्शक टीका आहेत. सध्यांच्या लेखन पद्धतींत ज्या सुधारणा ग्रंथ कर्त्यांनीं सुचविल्या आहेत त्या ग्रथित करून तो लीहिला आहे. शिवाय जुन्या तऱ्हेच्या शास्त्रीवैदिकांत जी मराठी भाषा प्रचलित आहे तीच या ग्रंथांत वापरली आहे. यामुळें अर्थातच आधुनिक ऱ्हस्वदीर्घ अनुस्वार इत्यादि विषयींच्या ठरीव नियमांचें यांत बरेच ठिकाणीं उल्लंघन झालेलें आहे; पण या मुळेंच ह्या ग्रंथाच्या भाषेस जुन्या बखरीच्या भाषेप्रमाणें एक प्रकारचें नूतनत्व व मनोरंजकत्व प्राप्त झालें आहे. सांप्रतच्या स्वर व्यंजन व्यवस्थेंतील व लेखन पद्धतींतील जे त्यांनीं दोष ह्मणून वर्तविले आहेत व ज्या सुधारणा सुचविल्या आहेत त्यांत पुष्कळ ग्राह्य भाग आहेत यांत संशय नाहीं. उदाहरणार्थ ऌॡ हे खरोखर स्वरच नव्हेत. खुद्द स्वर अ या अक्षराची बाराखडीच होते. व त्या प्रमाणेंच लिहिले जावे. चछजझ याचे उच्चार तीन तऱ्हेचे होतात; तर ते तीन तऱ्हेनें लिहिले जावे.च वर्गांतील शेवटचा ञ ची खरोखर जरूरीच नाहीं. क्ष व ज्ञ हे स्वतंत्र व्यंजनें नव्हेतच. इत्यादि सर्व सूचनांचा विचार होऊन ग्राह्य ठरतील त्या सुधारणा अमलांत येतील तर चांगलें होईल असें माझें मत आहे. रा. रा. पाध्ये शास्त्री यांनीं आपला पक्ष मोठ्या मुद्देसूद रीतीनें व दृष्टांत रूपकाचें साह्य घेऊन प्रतिपादला आहे. तरी विद्वान् नूतन विचाराभिलाषी व गुणग्राही लोकांनीं हा ग्रंथ अवश्य वाचावा अशी माझी शिफारस आहे.

मुबई ता. ९ मार्च १९११ **दामोदर गणेश पाध्ये**

हा ग्रंथ स्वरव्यंजन नावाचा लीहिला त्यासंबंधी थोडी हकी-

गत-भाषेसंबंधीं आमचें शिक्षण लेखन वाचन शाळेंत मुळींच झालेलें नाहीं।। घरचेवरीं श्री ग पासून अआइई व कखग पासून ळ पर्यंत एवढेंच कायतें शिकलों. ।। याच्यापुढें बाराखडया अथवा फाडे किंवा सवायकी दीडकी वगैरे शपथ वहाण्याला आजमिती पर्यंत एक अक्षराचें अध्ययन शिक्षण कांहीं नाहीं. तरमग केलें काय ? वेदारंभ पुस्तक पुढें ठेवून शिक्षा ज्योतिष छंद निघंट एथपर्यंत बऱ्याच अक्षरांची ओळख पटत चाऌली ।। पुढें अष्टाध्याइ चालू केली. त्यांत जोडाक्षरांची माहिती बरीच झाली. पानावर अंक असतात त्यामुळें ४ अध्यायाचीं पानें ५० होतीं ह्मणून पन्नासापर्यंत आंकडे समजले. पुढें ४ अध्याय झाले तेव्हां १०० पर्यंत आंकडे पाठ झाले. पण सदोतीस अडतीस एकुणतीस असें तोंडांत येई तेव्हां सोबती रागें भरत ।। सत्तेचाळीस अठ्ठेचाळीस एकुणचाळीस असेंच तोंडांत येई. असें रोज चुके. पुढें सत्याऌशीं अठ्यांऌशी नव्याऌशीं हें मला पसंत पडलें. पुढें सत्याण्णव्वद अठ्याण्णव्वद नव्याण्णव्वद हें माझ्या पसंतीस आलें. तेव्हां ती मागली चुकी सांपडली. तेव्हां पासून सर्व अंक तपासले. सर्व चुका सांपडल्या ।। हेंच शिक्षण शाळेंत झालें असतें तर चुकी लागली नसती व समजलीहि नसती ।। असो ।। असें अध्ययन ओटीवर बसून २४ वर्षें केलें. पुढें २४ वर्षें विद्यार्थ्यांस शिकविलें. घना पर्यंत दशग्रंथ जेवण्या पुतीं व निजण्या पुरती सुटी गावांत काय होत असे तेंही माहिती नाहीं ।। घरांत बायका पुरुष बोलतात ती भाषा ।। जें अहोरात्रींत दृष्टीस पडेल तें शिक्षण ।। एकेका अक्षराला बाराखडी असते हें कित्येक वर्षें माहीत नव्हतें. ते प्रकार पोथींतून निवडून काढले तेव्हां क मध्यें कृकॄकाढले पुढें बाराखडया पाहिल्या त्यांत नाहीं तेव्हां ही चूक समजली. असें झालें. आमचें शिक्षण लिहिणें वाचणें वगैरे शाळेंत कांहीं एक झालेलें नाहीं आणि ग्रंथ लिहिण्याचा तर प्रसंग आला. तेव्हां

कसें तरी करून लिहून काढला. हा कोणातरी चांगल्या शिकलेल्या मनुष्याच्या हातीं द्यावा व मग छापून काढावा अशा विचारांत पंचवीस तीस वर्षें निघून गेलीं, कोणी पंन्नास रुपये घेऊं कोणी पंचवीस घेऊं असें ह्मणत व कोणी कोणी तर हा ग्रंथ अक्षरशः खोटा आहे ह्मणून आह्मीं लिहूं इच्छित नाहीं असेंही ह्मणाले. इतक्या काळांत केवळ धर्मार्थ दुरुस्त करून देण्यास कोणी ही भेटलें नाहीं. पुढें एक वेळ टिळक महाराजांस भेटलों. त्यांनीं आठच दिवसांत वाचून पाहून "हा ग्रंथ अक्षरशः बरोबर आहे" असें ह्मटलें आणि "हा, लोकांत प्रसिद्ध झालाच पाहिजे, पण एवढा काळ कां गेला?" असेंही ह्मटलें, तेव्हां मी त्याचें कारण वर लिहिल्या प्रमाणे सांगितलें तेव्हां ते ह्मणाले ' दुरुस्ती करण्याचें कारण कांहीं नाहीं, जसें आहे तसें छापून काढा." तेव्हां तो उपदेश घेतला. पुढें मी पैशांची अडचण सांगितली, त्यावर ते ह्मणाले "सर्व खर्च मी करतों. दोन महिन्यानंतर सर्व प्रती घेऊन जा" आमच्या दुर्दैवानुळें यांतील कांहींएक घडलें नाहीं. असो. परोपकारी, मार्गदर्शक अशा टिळकांचे आह्मी फारफार आभार मानितों व ते जेथें असतील तेथें सुखी असोत अशी परमेश्वराजवळ नित्य प्रार्थना कारितों. आमची लिपी विलक्षण आहे, ती लिहिण्याजोगे टाईप कोठें मिळणार नाहींत. परोपकार कर्ते ह्मणतात, तुमच्या लिपी प्रमाणें मी नवे टाइप करून छापून देईन! त्यांच्या उपदेशावरून दुरुस्त न कारितां आज हा ग्रंथ शिळाप्रेसावर छापावा लागला या दुरुस्तीच्या उद्योगाकरितां पुण्यास सात आठ महिने रहावें लागलें. कोणाच्या भेटी घेणें त्या रा. रा. पांडुरंग जनार्दन पुराणिक पनवेलकर यांच्या मार्फत घेतल्या. या सद्गृहस्थांनीं माझ्या कारितां आपलें काम बाजूस ठेवून देखील, तसदी घेतली. या साठीं आह्मीं त्यांचे आभारी आहों. हा ग्रंथ लिहिण्याचें उत्तेजन रा. रा. कोंडोपंत नाना छत्रे यांनीं दिलें व ह्मणाले कीं हा

जगप्रसिद्ध झालाच पाहिजे. पाहिजे तो दृष्टांत द्या, पाहिजे तें उदाहरण द्या, विस्तार होईल तरी होउंद्या. परंतु उद्योग सोडूं नका, लिहून काढा. तो उपदेश आह्मीं मान्य करून, छापण्यापर्यंत मजल आली. याचा जर जगांत कोणाला उपयोग झाला तर त्याचें श्रेय त्यांच्याच कडे जाणार. आह्मी केवळ लेखक आहों तेव्हां त्यांचे आभार मानणें जरूर आहे. परंतु या ग्रंथाला प्रस्तावना नाहीं. ती उणीव दूर करण्याकरितां मागें सांगितलेले पुराणिक यांच्या मार्फत प्रो० भानू साहेब यांची भेट घेऊन त्यांजकडून प्रस्तावना लिहून घेतली. हें आमचें न्यून पडत होतें तें त्यांनीं केवळ परोपकार बुद्धीनें आठच दिवसांत दूर करून दिलें याबद्दल त्यांचेहि आभार मानतों. आतां पुण्यास सातआठ महिने राहिलों कसा ? "सर्वारंभास्तंडुलः प्रस्थमूलं" ही सर्वांत मोठी अडचण आहे रा रा. वासुदेव रामचंद्र जोगळेकर यानीं अश्वासन दिलें कीं तुमचें पुण्यांत जितकें कार्य असेल तितकें पूर्ण होइतों तुह्मी येथून जाऊं नये व बिऱ्हाड दुसरे ठिकाणीं नेऊं नये ? मी दमेकरी, खोकलेकरी फार आजारी होतों तरी त्या तिघांहीं बंधूनीं आमचें आदरातिथ्य किती केल त्याचें आमच्यानें वर्णन केलें जाणार नाहीं. आमच्या योग्यतेपेक्षां ते आमचा मान जास्त ठेवीत. अजन देखील " आतां पुनः केव्हां याल? अशीं पत्रें वारंवार येतात ! तर यांचे आभार कितीही मानले तरी थोडेच आहेत. त्यांचें कल्याण असो, ते सुखी असोत. दीर्घायुषी असोत असे आशीर्वादच आह्मीं त्यांनां देतों, यापेक्षां जास्त आमच्याकडून होणें शक्य नाहीं.

आतां सर्व विद्वज्जनांनां एवढीच प्रार्थना करावयाची कीं हा माझा लहानसा प्रयत्न वाचून झाल्यावर त्यांचे त्या विषयीं जसें मत होईल व याबद्दल अनुकूल अगर प्रतिकूल टिका करणें असेल तर ती त्यानीं कृपा करून ' केसरी पत्रांत छापावी. कारण, मी तेवढेंच एक पत्र नेहमीं वाचीत असतों.

श्रीगणेशाय नमः

ग्रंथ वाचण्याची परिभाषा. अआची बाराखडी अ प्रमाणें काढली जाअील. प्राकृत चवर्ग च छ ज झ ञ या प्रमाणें काढण्यांत येअील. ज्ञ हें अक्षर ज्ञ असें काढण्यांत येअील. ऋ हें अृ असें लिहिण्यांत येअील. अुदा॰ ह्मणजे अुदाहरण. प्र॰ ह्मणजे प्रश्न. अु॰ ह्मणजे अुत्तर. सम्जावें. मद्दा प्राकृत चवर्ग "च" छ "ज" झ "ञ या प्रमाणा वरून ओळखावा.

स्वर आणि व्यंजनें याच्या अुच्चार व आकार वगैरे पुष्कळ विषयांत माझ्यामतें व्याकरण शास्त्रांत विचार केलेला दिसत नाहीं. ह्या करितां हे विषय विद्वज्जनापुढें मांडावे व सदर्हू संबंधानें लोकमत काय आहे तें समजून घ्यावें ह्मणून हा पुढील लेख लिहीत आहें. विषयांची अनुक्रमणिका. कलम-१ स्वर १६ आहेत असें अैकूं येतें व बाराखडींत बाराच दिसतात. कलम २- च वर्गाचें पांचवें अक्षर ञ हा चालू अुच्चार खोटा आहे. कलम ३- निर्ऋती या शब्दाला जो रेफ ह्मणतात् तो सिद्ध होत नाहीं. व लेख सुध्दां चुकीचा आहे. कलम ४- कृष्ण या शब्दांत जो रकार अुच्चारांत येतो तो नको आहे लेख मात्र बरोबर

र आहे. कलम ५- अंजन या शब्दांत शास्त्री लो-
क ञू काराचा अुच्चार करितात तो चुकीचा आहे.
कलम ६- तत् सवितुः या दोन पदांचा संधी कसा
करावा हें व्याकरण शास्त्रांत कोठें सांगितलेलें दि-
सत नाहीं. लेखही चुकीचा आहे. कलम ७-
तत् या पुढें षकार आला असतां त्याचाही संधि
दाखविलेला नाहीं. यामुळें लोक करीत नाहींत.
व लेखही सुधारणें जरुर आहे. कलम ८- संज्ञा
या शब्दाचातर अुच्चारांत व लेखांत फारच नाश
झाला आहे. कलम ९- ज ञो ज्ञः हें सूत्र पुढें
ढकलतात. त्यांनतर अज्ञान पणाचा कळस के-
ला आहे. कलम १०- ऋ ऌ हीं दोन्हीं व्यंजनें
असतां स्वरांत घुसडलीं आहेत. कलम ११-
कृसि या शब्दाचें प्रथमाक्षर जोड असतां तें न मा-
ननें आणि अेकेरी अक्षराचे बारा खडींत म्ह-
णजे ककाचे सोळा खडींत ९ नंबरांत आणणें
ह्या दोन चुक्या जबरदस्त होत आहेत. कलम १२
कृ हें ककाचे बारा खडींत अवश्य पाहिजे होतें
कारण तें जोड नाहीं म्हणून. तें घातलें म्हणजे चौ
दा खडी होणार. कलम १३- च वर्ग संस्कृत
च वर्ग प्राकृत तसाच तिसरा च वर्ग हा महाम्र-
कृत या दोन्हीं वर्गांचीं जर अुदाहरणें वेदांत आ-
हेत तर व्याकरण शास्त्रांत याचा अुलगडा कां न-

सावा. कलम १४- मात्रांचा विचार शास्त्र ह्मण-
तें त्रिमात्र. मी त्याला चार मात्र म्हणतों. याचा न्या-
य झाला पाहिजे. कलम १५- स्वररहित व्यंजना
चा अुच्चार कसा करावा. मास्तर लोक करून दा-
खवितात तो स्वर सहित होतो. कलम १६- मघ-
वन् श्चोततंति या दोन पदांचा संधि अनेक प्रकारें
अैकूं येतो. या वरून निबंध ठरविलेला नसावा अ-
सें वाटतें. कलम १७- अंक विषय- दर दसकांत
नववा अंक अेकोन त्रिंशत् अथवा अेकान्नत्रिं-
शत् असे दोन प्रकार कां ? माझें मत या दोहोंहून
फारच भिन्न आहे. कलम १९- अवकहडा चक्र.
डा ह्मणतो मी ड होतों तो कोणत्या अपराधानीं मा
झा डा केला. कलम २०- हा ग्रंथ कोणास मान्य
झाला त्यांचीं नावें. पुणें येथील मंडळी- शास्त्री व
गृहस्थ- वे. शा. रा. रा. गंगाधरशास्त्री दातार. १
कृष्णशास्त्री चिपळूणकर. १ काशिनाथ शास्त्री आ-
गाशे. १ अनंतशास्त्री फडके. १ पांडुरंगशास्त्री पा-
थरकर. १ नाना शाळिग्राम. रा. रा. केरोपंत नाना
छत्रे. १ महादेव गोविंद रानडे. १ महादेव मोरेश्वर
कुंटे. १ शंकर पांडुरंग पंडित. १ कोंडोपंत अण्णा
छत्रे. १ बळवंतराव देव बडोदेकर. १ गोपाळ
बळवंत नेने. १ आबाजी विष्णु काथवटे. १ राम-
कृष्ण गोपाळ भांडारकर. १ शंकर मोरो रानडे.

१ लक्ष्मण मोरेश्वर देशपांडे. १ गणेशजनार्दन आगाशे बी. ए. १ काशिनाथ नारायण साने. १ पायडी वसअी. वे. शा. राजाराम शास्त्री बोडस १ भिकाचार्य अैनापुरे वांअी. १ कमळाकरशास्त्री जोशी खेड. १ बाळशास्त्री अठवले. रत्नागिरी. १ चिंतामण शास्त्री देव वाडें घोडें. १ गणेश शास्त्री टुकडीकर. कोल्हापूर. १ आत्मारामशास्त्री पित्ये कोल्हापूर. १ वे. शा. श्री. शंकरभट्ट फणसळकर कोल्हापूर. १ बाबू पाध्ये व १ वासुदेव पाध्ये भालावली. १ वे. शा. दत्तात्रेय शास्त्री निगुडकर राजापूर. १ कृष्णाशास्त्री नवरे राजापूर. १ बाळशास्त्री पुराणीक नागांव. १ वासुदेव भट्ट अंब्राणीकर. १ गंगाधर गुरुजी घनपाठी बडोदें. १ बाळंभट दातार घनपाठी कर्नाळी. १ गोविंदशास्त्री काळेले. बडोदें. १ नानाशास्त्री टकले. नाशिक. १ वे. शा. सिताराम शास्त्री महाशब्दे. नाशिक. १ यज्ञेश्वरशास्त्री व १ कृष्णशास्त्री सुरतकर. १ रंगाचार्य रड्डी. मुंबअी.

॥श्रीगणेशायनमः॥ श्रीसरस्वत्यैनमः॥ श्रीगुरुचरणारविंदाभ्यां नमः॥ श्रीमातापितृभ्यांनमः ॥ येनाक्षर स० तस्मैपाणिनये नमः ॥१॥ येनधौता० नमः ॥२॥ अज्ञानांधस्य० नमः ॥३॥ आपणास अनन्यभावें शरण येऊन विनंती करित आहें किं, मलाजें वाटलें कीं हें सत्य तें ईश्वर प्रेरणेनें कळलें तें मी येथें लिहून काढितों तें आपले चरणी अर्पण असो. ॥

विद्वत्‌जनांस प्रार्थनाः मी जें प्रकरण हत्तांत घेतलें आहे तें बरें कोणी ही ह्मणणार नाहींत् हें साहस आहे असेंहि लोक ह्मणतात. तथापि बहुत समाजाचें ह्मणणें असें आहे कीं हें आपलें कर्तव्य आहे हें अवश्य केलेंच पाहिजे. याचा लेख प्रसिद्ध झालाच पाहिजे. तें मान्य करून लिहिण्यास प्रारंभ करितों. ॥नमन॥ गणेशा तुझीं पाद पद्में सुरंगें हृदयिंधरिलिंऱ्या मानसीं प्रेमरंगें ॥ करीतों कथा ही अभंगीं चढोंदे प्रसिध्दि जगा मांजि हीची घडोंदे ॥१॥ मंगळ मूर्ती मोरया ॥ निर्विघ्नमस्तु ॥ ॥ शुभंभवतु ॥ ॥

जुना कित्ता बाळबोध. देवनगरीलिपी. त्यावरील हे १६ स्वर ॥ अ आ इ ई उ ऊ ऋ ॠ ऌ ॡ ए ऐ ओ औ अं अः ॥ हेच स्वर जुन्या निबंधा प्रमाणें ह्मणजे प्रत्येक बारा खडींत ज्या निशाणी वरून हें अक्षर ओळखलें जातें तेच स्वर हे पुढील होत. ॥

अ आ अि अी अु अू अृ अॄ अॆ अॆ ओ औ अं अः हे १४ होतात्. यांत ऌ ॡ हे दोन मी मुळींच गाळले. कारण त्यांजकडे नीट पहा म्हणजे हीं व्यंजनें ललाचे १४ खडीतलीं आहेत. सात आठ नंबरचीं हें ध्यानांत सहज येण्या सारखें आहे. तर हीं व्यंजनें २ स्वरांच्या यादींत कां असावीं म्हणून काढून टाकिलीं. तेव्हां सोळाच्या संख्येंत २ कमी पडले हें खरें. तरमग १४ च स्वरआहेत असें कां म्हणूं नये. हेंच खरें. जर १६ च स्वर खरे असते तर प्रत्येक व्यंजनाच्या सोळाखडया मुलांनां शिकवल्या असत्या. त्या नाहींत. हें मोठें प्रमाणहोय. असो १६ नाहींत हें ठरलें पण चवदाखडी व्यंजनाची अृ अॄ जमेस धरून काय शिकवण्याला अडचण होती. चवदाखडी याचा अर्थ काय? तर जोडाक्षर न जमेस धरितां प्रत्येक व्यंजनाचे प्रकार जेवढे अढळतील तेवढे निरनिराळे गोवून ठेवणे. जर चवदाच स्वर आहेत म्हणूनच चवदा खडी. मग ककामध्यें कृ कॄ पपामध्यें पृ पॄ तता मध्यें तृ तॄ ॥ जोडाक्षरें हीं नाहींत. मग प्रत्येक व्यंजनाचीं चवदा अक्षरें निर्विवाद असतां बाराखडी प्रत्येक व्यंजनाची शिकवली ही जबर्दस्त चूक झाली असें मी म्हणतों. असो वर लिहिलेले जे १४ प्रकार यांस शास्त्री

लोक स्वर असें ह्मणतात. तें मलाहि कबूल आहे. पण मी यांस प्रकार अथवा जाती किंवा बाराखडी चवदाखडी अथवा सोळाखडी असें ह्मणणार तें मात्र शास्त्रीबावांस कबूल होत नाहीं. कां ते ह्मणतात हीं अक्षरें च नाहींत तरमग याला बारा खडी हें ह्मणणें सिध्धच होत नाहीं. या बोलण्याचें मी अक्षरशः खंडण करितों. कसें. जसें वाला मध्यें अनेक प्रकार अथवा जाती आहेत. ह्मणजे घेवडया मध्यें तथापि वाल हा सर्वां मध्यें अेकच. दुसरें अुदाहरण- अंब्या मध्यें हपूस पाअीर केळ्या वगैरे बहुत जाती आहेत तथापि अंबा अेकच. आणखी अुदा०- सोन्याचे दागिने १६ प्रकारचे असतात तथापि सर्वां मध्यें सोनें अेकच तात्पर्य स्वर ह्म० काय- अ आची बाराखडी. मग चवदा खडी ह्मणा सोळाखडी ह्मणा. व्यंजन ह्म०- काय- कख पासून कित्त्याबर लिहिलेलीं अक्षरें तीं ळ पर्यंत. पुढें क्ष आहे हें काय. जोडाक्षराचा अुच्चार कसा करावा त्याचें अुदा० आहे. पुढें ज्ञ लिहिलें आहे हें काय आहे. हें तीन अक्षरांचें जोड आलें असतां त्याचा अुच्चार कसा करावा त्याचें अुदा० आहे. क्षमध्यें २ कोणचीं क् ष्. माझें ह्म०- ख् ष्. ज्ञ मध्यें ३ कोणचीं द् न् य. हीं तीन मी ह्मणतों. शा०- ज् ञ. हाण-

तात्. झालेख व उच्चार अतिशयवादग्रस्त असल्यामुळें व लेख अति भ्रामक असल्यामुळें पुढें ह्यांचा विस्तारांत याचा न्याय करूं. या पेक्षां कित्यावर दुःस्वप्न्य हा शब्द घातला असतातर त्याचा अुच्चार अथवा लेख पहाण्या बरोबर हें काय आहे ही शंकाच अली नसती. असो. ॥

स्वर ह्म०-काय. व्यंजन ह्म०-काय हें सांगितलें पण त्याचा याचा संबंध काय व अक्षर ह्म० काय. व त्याचें लक्षण. अक्षरें २ प्रकारचीं असतात स्वर रूपी अक्षरें. आणि व्यंजन रूपी अक्षरें. स्वरहे स्वतः सिध्द आहेत्. ह्म० त्यांस व्यंजनाची अपेक्षा नाहीं. पण व्यंजन मात्र स्वतः सिध्द नाहीं. प्रत्येकास स्वराची अपेक्षा आहे. जा व्यंजनास स्वर स्पर्श नाहीं त्याची गणना अक्षर संख्येंत धरली जात नाहीं. ह्म० तीं अर्धालीं अक्षरें होत्. अुदा०. गायत्री मंत्राचें शेवटचें त् हें संख्येंत नाहीं. वषट् भूभृत् अुष्णिक् या तिन्हीं शब्दाचीं शेवटचीं अक्षरें हीं अर्धालीं आहेत् हे तिन्ही शब्द दोन दोन अक्षरांचे समजावें. तात्पर्य सर्व व्यंजनें अर्धालीं अक्षरें आहेत् प्रत्येकास रूप अेकच. दुसरें नाहीं तरमग प्रत्येक व्यंजनाचीं बारा रूपें ह्म०-बाराखडी ही कशी सिध्द झाली अहो स्वराचा मदतीनी. मग स्वर अर सोळाठलें तर प्रत्येक व्यंजनांची

सोळा खडी झालीच पाहिजे. यांत शंका कशाला पाहिजे. अआची बाराखडी तर सिध्द झाली पण शा० ह्मणतात स्वर हें अक्षर नवे. तें आतां खंडण करितों. स्वराला जर अक्षर सञ्ज्ञा नसती. तर वेदांत प्रत्येक मंत्रांत स्वर मिश्र झालेले आहेत् व ते अक्षर संख्येंत जमेस धरलेले आहेत् त्यां-चीं प्रमाणें. अष्टाक्षरा गायत्री. ह्मणजे १ चरण एकादशाक्षरात्रिष्टुप् ह्म०-१ चरण. द्वादशाक्ष-रा जगती. ह्म०-१ चरण. समजावा. अुदा०- अिति वा अिति मे मनः ॥ हा गायत्री छंद आहे ८ अक्षरें आहेत्. त्यांत २ स्वर आहेत्. आपोहि-ष्ठा या आठांत अेक स्वर आहे. आकृष्णेन० या ११ अक्षरांत १ स्वर आहे. आनः शृण्वन्० या बारा अक्षरांत १ स्वर आहे. व तो अक्षर संख्येंत धरला आहे. तेव्हां या प्रमाणा वरून शास्त्री बावाचें मत खोटें ठरलें. आतां शा०- ह्मणतात्. अला बाराखडी नाहीं. त्याचा विचार जर आ अी बाप मानला नाहीं तर प्रजा अुत्पन्न झाली कोठून. तसें. स्वरानां जर बाराखडी नाहीं तर प्रत्येक व्यंजनाची आज मितीस अुपलब्ध आहे ती आली कोठून. मग १६ स्वर ठरल्यास चंवदाखडी. आणि जर ते कोणास १६ सांपड-तील तर प्रत्येक व्यंजनाची सोळाखडी ही निर्विवा-

द होणार. हा सिद्धांत आहे. अेक शास्त्रीबुवा- स्वराविंशति रेकब्द ।। यांत तर २१ स्वर आहेत् त्याचें उ०- ते मजपुढें घेऊन या बुवा० प्रत्येक व्यं- जनाची अेक विंशत्यक्षरी करून देतों. शास्त्री बुवा०- हा आमचा १६ स्वरांचा कित्ता आहे हा घ्या आणि प्रत्येकांची सोळारवडी करून द्या. मी तो फाडून चिंध्या करून फेकून दिल्या. तेव्हां शा- स्त्री बोवांस फार राग आला. आणि तांबडे लाल झाले. व बोलले हें काय. मी-हे खोटे स्वर म- जपुढें ठेऊन सोळाखडी मागतां काय? शास्त्री बुवा- हे जर खोटे तर मग खरें काय? तें सांगतों. हे सोळा स्वर बुवा. अंबे समजा. ते अेका करं- ड्यांत असतां कोणी दगलबाजीनें त्यांतून ४ काढून घेतले. नंतर त्यांत २ चिन्हांटें व २ वेल फळें पिकलेलीं अशीं घालून ठेवलीं. पुढें मा- लकांनीं झांकण शिऊन अेकाचे डोकीवर दे- ऊन अेका श्रीमंताकडे भेट पाठवली. गडी०- सोळा नग मोजून घ्या आणि पावती द्या. ते मोजून घेतले. पावती दिली. त्या वेळेस करंड्या भोंतालीं शास्त्री पंडित आश्रीत मंडळी बहुत होती. परंतु कोणाचे लक्षांत आलें नाहीं. कारण रंगास रंग. अेका जागीं अुबल्या मुळें वासास वास. असें झालें. पुढें सर्व मंडळी अंबे खाण्या-

स तयार झाली. सर्वांस अेकेक फोड दिली. रवा
ते वेळेस कुजबुज करावयास लागले. तेव्हां १ म्ह०
तोंड कां वांकडें करितां अंबट आहे कीं काय ?
अंबट तर नाहीं पण चमत्कारीक लागतो म्हणून
दूसरे अेकास विचारलें ते म्हणतात कांहीं बाहीं
च लागतो. तिसऱ्यास विचारलें ते म्हणतात आहे
तर हपूस पण कच्चा पिकलेला असावा. चवथ्या
स विचारलें. त्यानीं बराच वेळ चघळून परिक्षा
केली अहो हा अुतरला आहे म्हणून असा लाग-
तो. ही झाली बेल फळाची परिक्षा. पुढें चिब्बा-
ड कांपलें आणि ४ फोडी करून चवघांस दिलें
आणि कसें लागतें म्हणून प्रत्येकास विचारिलें. तें
चांगलें परिपक्क झालें होतें म्हणून त्याची परिक्षा
लवकर होअीना. तेव्हां अेक मेकाचे तोंडाकडे पहा-
वयास लागले. तेव्हां श्रीमंत यजमान आश्रितांस
विचारतात्. कांहो विष्णू भटजी अंबा कसा ला-
गतो आहे तो सांगत कां नाहीं. कांहो गोविंद भ-
टजी बोलत कां नाहीं. तेव्हां अेकदांचे बोले जरा
गुळमट लागतो. दुसरे- जरा कडवट लागतो.
तिसरे- जरा मघां पेक्षां जास्त अुतरला आहे.
तेथें अेक आश्रिताहून तिऱ्हाअीत होते ते म्ह-
णाले अेक फोड मला द्या पाहूं. फोड तोंडांत घा-
तल्या बरोबर थू थू करीत अुठले. जळोतरे तुमचे

अंबे. त्या पहिल्या हड्सची अेक फोड द्यापाहूं. घास घेऊन ह्मणाले अहो तुह्मी रंगालापाहून भुललां. हें बेलफळ तुह्माला समजेना. काय सां गावें. आणि पूर्वीचें चिह्रांट तुह्माला ओळखलें नाहीं. धन्य असो तुमच्या परिक्षेची. तेथे आश्रि- तांपैकीं कोणी धूर्त होते. ते कोंपऱ्यांत साली अु- डवुन दिल्या हो ग त्यांत बांठे आहेत किंवा ना- हींत हें तपासण्यास गेले. तिह्राहीत ह्मणतात कोपऱ्यांत काय पहातां. धूर्त०- बांठे तिह्राअीत. धन्य असो तुमच्या अक्कलेची व परिक्षेची. अ- हो बेल फळांत व चिह्रांटांत कोठें बांठे असतात काय. या प्रत्यक्ष बिंया पडल्या आहेत यापहा. तेहां षडशास्त्राध्ययन केलेले आश्रीत पंडितजी बोलले. त्या बिंयावर आमचा भरंवसा नाहीं. तिह्रा०- प्रत्यक्ष पुराव्याला जर मानीत नाहीं असें ह्मणलां तरमग तुमचा भरंवसा तरि कशावर आहे. शा०- लेखावर. तिह्रा०- कोणाचालेखा- वर. शा०- वावानी मंडळीकांची सही दाखवली. तिह्रा०- अंब्याचा करंडा तोंड बंद करून शिव- लेला पुढें आणला त्या वर त्यानी सही केली अ- सेल. तुमचें ह्मणणें असें आहे किं काय. त्यां- नीं शबरीच्या बोरा प्रमाणें प्रत्येक अंबा चाखून पाहून मग सही केली असेल. आणितसें जरी-

केलें असलें तरी तुह्मी प्रत्यक्ष चारवलेंत त्याचें काय कळलें तें सांगा. सारांश सोळा स्वर पुढें आ-णून टविलेत त्यावर पाणिनींनी सद्दि केली अ-सेल. सद्दी ह्म०-व्याकरण सूत्रें. त्यानी काय सर्व स्वर तपासून पाहिले असतील मंडलीका प्रमा-णें. तर मग हें त्यांना समजलें नसेल असें काह्म-णाचें. समजलें नसेल असें कोणी ह्मणावें. सो-नाराच्या वाटी प्रमाणें घडलें असेल. शास्त्री वि-चारतात्- वाटीची कथा काय आहे. तिह्मा०-सांगतात्- सोनाराची गोष्ट- कोणी अेक गृह-स्थ अेका सोनाराचे दुकानी गेले आणि ह्मणाले-शेटजी- हा सोन्याचा तुकडा आहे. २ तोळे व-जन आहे. याची अह्माला देवा करितां नै-वेद्याची वाटी करून द्या. शेटजीनी अुलथा पा-लथा करून पाहिला. आणि सांगितलें. ह्याची घडाअी. दर तोळ्यास चार आणे प्रमाणें घेत असतों. तेह्वां दोन तोळ्यांचे आठ आणे पडती-ल. ठीक आहे. कधीं द्याल. शेट- अेक कला-रवभर बसत असाल तर अत्तां करून देतों. गृह०- मनांत ह्मणतात् हें बरें आहे. बदलण्या-ची भीती नाहीं. कबुल केलें. शेट मनात ह्मण-तात् हें बरें आहे. बदलल्याचा आळ नको. वा-टी करून दिली आठ आणे घेतले. गृहस्थ गेले.

तेथें पूर्वी १ गृहस्थ दुकानांत बसलेले होते त्यांनीं हा सर्व तमाशा पाहिला. शेटला प्रश्न केला. कां हो शेटजी ही वाटी केलीत हें सोनें च होतें कां. शेठ- छे होतें पितळ होतें. गृह०- मग तुह्मीं कोठें बोललेत नाहीं. शेठ- काय ह्मणून बोलावें. गृ०- तुह्मी सांगाला नको का. शेट- त्यानीं विचारलें होतें का. हें काय भावाचें आहे ह्मणून. तर सांगणें ठीक होतें. अुगाच सांगून अपला फायदा मात्र बुडवावा आठ आणे मिळाले असते का. ह्मणूनच तावडतोब करून दिली. नाहींतर अुद्यां ह्मणते. शेटनी दगलबाजी केली. सोनें खाऊन पितळ हतांत दिलें. असें ह्मटलें असतें. तात्पर्य कायकी- तुह्मी किस्ता पाणिनी पुढें ठेवलात्. हे सोळ स्वर. व हीं व्यंजनें हीं घ्या. आणि याचें अह्माला व्याकरण करून द्या. दिलें ह्मणून त्यांस स्वरांतली लबाडी कळली नसेल. असें कशावरून ह्मणावें. जर तुह्मी असा किस्ता पुढें ठेवला असता तर तसें करून मिळालें असतें. तो कसा. ॥ श्रीगणेशायनमः ॥ ओं नमःसिद्धं ॥ स्वर १६ असे- अ आ अि अी अु अू अृ अॄ अे अै ओ औ अं अः व्यंजनें ४४ क ख ग घ ङ (संस्कृत च छ ज झ ञ) प्राकृत च छ ज झ ञ (महा प्राकृत च छ ज झ ञ

ठडडढण. तथदधन. पफबभम. यरलवश षसहळ ॥ क्ष ज्ञ वहल दुःखवम्यं ॥ असो ग्रंथ विस्तार फार झाला माफ करा. प्रत्यक्ष प्रमाणास न जुमाननारे महा पंडित ठिक ठिकाणी लेखावर भरंवसा ठेवून कसे फसले गेले यांचीं अुदाहरणें अेका पुढें अेकेक पहाण्यांत येतील. तेह्वां माझा बोलण्याचें अनुभवास येअील. ॥ प्रत्यक्ष प्रमाण मिळत असतां जास ताळा नाहीं अशा लेखास मी मुळींच मानीत नाहीं. जो लेख बरोबर नाहीं. त्याचा ताळा कधीं ही पडावयाचा नाहीं. हें दाखवण्या करितां पुढें अेक कोष्टक देतों. तें पाहिलें असतां ताळा मुळींच पडत नाहीं असें पुष्कळ दिसण्यांत येअील. त्यांत ८ बाराखडया अुदाहरणार्थ येतील. पैकीं १ स्वराची ॥ ३ मूळा-क्षरांचा (ह्मo अेकेरी अक्षरांचा) व ४ जोडाक्ष-रांचा. अेवढयाचा ताळा पाहूं गेल्यास त्यांत ५२ चुक्या दृष्टीस पडतील. पैकीं २६ लेखाचा आ-णि २६ अुच्चाराचा. आठच बाराखडया कां घेतल्या तर त्यांची अेकमेकांत गुंतागुंत आहे. ह्मणून तेवढया घ्याव्या लागल्या त्याची व्याख्या वाचते वेळीं तें कोष्टक पुढें मांडून नंबरवार ताळा पहात असावा. अुदाहरणार्थ. सोनें रुपें वगैरे धातूचें घेतलें आहे. सोनें अेकच परंतु त्याचे

दागिनें अथवा भांडीं १६ कराचीं. तांब्यापंच-पात्री प्याला पळी ताह्मन गडवा तबकडी झारी वगैरे केलीं ते घांट मात्र प्रत्येक भिन्न होतात परंतु सोनें हें सर्वांत अेकच असतें. हा मुद्दा नीट लक्षांत ठेवावा. त्या प्रमाणें हींच भांडीं रुप्यचीं होतात. तांब्या पंचपात्री प्याला पळी ताह्मन गडवा तबकडी झारी. नावें हीं मघाचींच आलीं परंतु यांत सोनें नाहीं. तर रुपें आहे पण तें सर्वांत अेकच आहे. तर हींच भांडीं तांब्यचीं होतात. पितळ्याचीं होतात कथलाचीं होतात. त्यांची नावें अेकच आहेत. तीं घाटा वरून आहेत. पळी ही जरी अेकच नाव आहे. तरी प्रा-क सोनें रुपें तांबें पितळ कथील हे धातु भिन्न आहेत. यावरून सर्व समजूत लवकर पडेल. प्रत्येक धातूचा दागिन्याचें रूप पहाणें तें अडव्या ओळी पहाव्या. हें पुढील कोष्टक जुने १६ स्वराचे कित्ते आहेत त्या प्रमाणें जसेस धरून प्रत्येक सोळाखडी लिहिली आहे. दादोबा पांडुरंगानी गाळलेले जे ऋ ॠ ऌ ॡ ते यांत धरले आहेत ॥ जर तुम्ही त्यानां स्वर मानतां तर अम्ही सोळा खडींत कां घे अूं नाहीं.

बावन चुक्याचें कोष्टक.

धातु	सोनें	कथील	रुपें	पितळ	कांसें	जस्त	तांबें	लोखंड	तिरवें
तुकडा	अ १	क १	र १	ल १	क्र १	ल्र १	क्ल १	क्लृ र्र १	
तोटा	आ २	का २	रा २	ला २	क्रा २	ल्रा २	क्ला २	क्ला र्रा २	
सरी	×इ ३	कि ३	रि ३	लि ३	क्रि ३	ल्रि ३	क्लि ३	क्लि र्रि ३	
कंठी	×ई ४	की ४	री ४	ली ४	क्री ४	ल्री ४	क्ली ४	क्लि र्री ४	
जोडवें	×उ ५	कु ५	×रु ५	लु ५	क्रु ५	ल्रु ५	क्लु ५	क्लु र्रु ५	
पवित्रक	×ऊ ई ६	कू ६	×रू ६	लू ६	क्रू ६	ल्रू ६	क्लू ६	क्लू र्रू ६	
अंगठी	×ऋ ऽ	ऽकृ ७	ऽ×रृ ७	ऽलृ ७	क्रृ ७	ल्रृ ७	ऽक्लृ ७	क्लृ र्रृ ७	
नथ	×ॠ ऽ	ऽकॄ ८	ऽ×रॄ ८	ऽलॄ ८	क्रॄ ८	ल्रॄ ८	ऽक्लॄ ८	क्लॄ र्रॄ ८	
सल्ला	×ऌ ऽ	ऽ×कॢ ९	ऽ×रॢ ९	ऽ×लॢ ९	क्रॢ ९	ऽ×ल्रॢ ९	ऽ×क्लॢ ९	ऽ×क्लॢ र्रॢ ९	
कुडुक	×ॡ ऽ	ऽ×कॣ १०	ऽ×रॣ १०	ऽ×लॣ १०	ऽ×क्रॣ १०	ऽ×ल्रॣ १०	ऽ×क्लॣ १०	ऽ×क्लॣ र्रॣ १०	
अुच्चार चुका	४	४	४	४	२	२	४	२	२६ बेरीज
लेख चुका	८	२	६	२	२	२	२	२	२६ बेरीज

निर्हृतीच्या कजित वाडा तिरचें हिरनरें यांनंतर
७ नंबरच्या लोक वापरतात.

प्रथम नंबरचे कोष्टकांत सर्व धातूंचे तुकडे सम- जावे ह्म०--त्यांस दागिन्यांचा आकार मुळींच नाहीं. ह्म०- अ हा सोन्याचा तुकडा क हा कथ- लाचा र हा रुप्याचा या प्रमाणें प्रथम नंबरचें अडवें कोष्टक समजावें. दुसरें नं० कोष्टक ह्म० तोडा आ हा सोन्याचा तोडा का हा कथलाचा तोडा. रा हा रुप्याचा. ला हा पितळेच्याचा या प्रमाणें पुढें सर्व धातूचे तोडे पहावे ह्म० काना हा तोडा होय हा सर्वांस सारखा आहे. ३ नं० सरि ह्म०- इ ही सोन्याची होय कि ही कथला- ची. रि ही रुप्याची या प्र० पुढें सर्व सऱ्या प- हाव्या. पण सोन्याचे सरीला प्रथम काना मग अक्षर आणि त्या कान्या वरून त्या अक्षरावर वेल्हा टी. हा सरिचा घाट तो येथें दिसत नाहीं. ह्म०-ि व सोनें ह्म०- अ तेंहि येथें दिसत नाहीं. यांत दोन चुक्या झाल्या अेक घाट व अेक धातु. तरमग अह्मी जाला आज पर्यंत सोन्याची सरी समजत आलों तें आहे तरी काय? अु० तें कुय- लीचें लेंड अूर्फ (शेंग) ह्म०- कुयली ह्मणून अे- क वनस्पती आहे त्याचा गूण ह्म०- अंगाला ला- गली असतां अर्धा तास नाच करावालागतो. शा- स्त्री ह्म०- आमच्या शास्त्रानीं जाला सोन्याची सरी ह्मटलें त्याला तुह्मी कुयली ह्मणतां याला

प्रमाण काय. अु० प्रत्यक्ष अनुभव. सोन्याची सरी सर्वत्र गळ्यांत अडकवतात तर हें सरी ह्मणून अेकाच्या गळ्यांत बांधा. बांधलें आणि जेव्हां नृत्य चालू झालें तेव्हां गाण्याचे सूर मधून मधून सुरु झाले. तेव्हां शास्त्रीबावांस हांक मारली. नृत्य पाहण्यास चला. तो गवयांच्या मुलगा होता तो ताल सूर सोडिना. शा०- हें प्रत्यक्ष प्रमाण अह्मी मानीत नाहीं. तर दादोबा पांडुरंगांनीं जें लेखी लिहिलेलें असेल तें अह्मी मानतो मी०- ताळा. शा०- शास्त्राला कोठें ताळा असतो तर त्याचें लेख हेंच प्रमाण. ताळ्याची शास्त्राला गरज नाहीं. विद्वज्जन हो हीं विद्वान् ह्मणवणाराचीं मतें अैका. ॥ ही लेखाची चुकी होय. पण अुच्चार बरोबर आहे. लेख पाहिजे कसा अि असा. आतां ४ नं० कंठी सर्व धातूचा कंट्या बरोबर आहेत् पण सोन्याचे कंठींत सोनें नाहीं व घाटही नाहीं. तर मग कशी पाहिजे. अी. ॥ ५ नं० जोडवें यांत जोडव्यांचा घाट ह्म० ७ सातांचा अंक तो खालीं आहे. पण अ हें सोनेंच नाहीं ही चूक. कसें पाहिजे अु. ॥ पुढें कु हें कथलाचें जोडवें रु हें रुप्याचें जोडवें. यांत र हें रुपें आहे पण जोडवें ह्म० - ७ साताचा अंकडा खालीं असतो तो नाहीं ही चूक तर

रु असा पाहिजे. पुढें सर्व नीट आहे. ६ नं०. सोन्याचें पवित्रक ॐ ऊ यांत सोनें नाहीं व पवित्रकाचा घाट ह्म०-ट खालीं अठाचा अंक असतो तोही नाहीं. यांत २ चुक्या तरमग अॄ असा. ६ नं०-रुप्याचें पवित्रक ह्म०-र कारखालीं ८ अठाचा अंक पाहिजे रू असा. पुढें सर्व ठीक आहे. ॥ ७ नं०- सोन्याची अंगठी ह्म०- ऋ यांत सोनें नाहीं व अंगठी ह्म० ० असें तेंहि नाहीं अुच्चार चुकला व लेखही चुकला. तर मग अॄ असा लेख पाहिजे पण अुच्चार करणें तो रकार न अुच्चारितां अंतीं जो अकारात्मक राहील तो सात नंबरचा स्वर होय. आतां ७ नं० कथलाची अंगठी कृ ही होय यांत कथील आहे व कंठीचा घाट हि आहे पण अुच्चार बरोबर नाहीं. तर हा अुच्चार कांशाचे अंगठीचा आहे. तरमग याचा कसा. तर रकार टाकून फक्त क् याला अ चा जाती पैकीं सातव्या नंबरचा अॄ हा स्वर त्याला लावावा. ह्म०- कृ हें अक्षर रकार रहित ह्मणावें ह्म०- कित्येक शाळा मास्तर विद्यार्थ्यांस क हें व्यंजन स्वर रहित करून कसें ह्मणावें क् प् त् हें ह्मणून दाखवितात् तसें. आतां मास्तर लोक जें ह्मणून दाखवतात् ती तर मोठी चूक होत आहे. मला मात्र तिचा या प्रसंगी अु-

दाहरणार्थ फारच अुपयोग झाला आहे. चूक कशीतर त्या उच्चाराचा लेख दाखवतो ऋ ॠ ऌ ॡ हीं तर स्वर सहित आहेत असो. आतां रुप्याची अंगठी ७ नं० ॠ यांत रुपें नाहीं व अंगठीचा घाट ह्मं०-८ हा नाहीं यांत २ चुक्या झाल्या. याचा अुच्चार व सोन्याचे आंगठीचा अुच्चार अेक मिळतो ही चुकींत चुक होत आहे. मग यांत समजावें तरी काय. तर सोन्याचे अंगठीस जो लोक उच्चार करितात तो येथें करावा ह्मं०-ऋ तत्वा ऋषी असा जो लोक अुच्चार करितात तो येथें समजावा. या वर जो रेफ देतात त्यामुळें याचा अुच्चार द्वित्त होतो. ह्मं०-निर्ऋती या प्रमाणें पण हा आहे चुकलेला सर्व्हा मला अुदा० देण्यास उपयोग होत आहे. माझें वेघळेंच आहे. तें निरृतीचे व्याख्यानांत स्पष्ट होअील. तात्पर्य ही रराची बाराखडी ह्मणजे अेकेरी अक्षराची यांत जोडाक्षराचें प्रयोजन काय जोड ह्मं०-ऋ ऋ अृ दोन व्यंजनें अेक स्वर तेह्वां हें जोड झालें तस्मात् हें खोटें आतां ७ नं०- पितळ्याची अंगठी ऌ हा लेख ठीक आहे. पण अुच्चारांत स्वरांपैकीं जो रकाराचा अुच्चार होतो ह्मं०-लृ याला ऋ स्वर लावला असतां लृ असा जो लोक ह्मणतात् अुदा०- व्याकरण सूत्रांत् लृ दृ

दाहरणार्थ फारच अुपयोग झाला आहे. चूक कशीतर त्या उच्चाराचा लेख दाखवतो कृ पृ तृ हीं तर स्वरसहित आहेत असो. आतां रुप्याची अंगठी ७ नं० ॠ यांत रुपें नाहीं व अंगठीचा घाट ह्म०-ट हा नाहीं यांत २ चुक्या झाल्या. याचा अुच्चार व सोन्याचे आंगठीचा अुच्चार अेक मिळतो ही चुकींत चुक होत आहे. मग यांत समजावें तरी काय. तर सोन्याचे अंगठीस जो लोक उच्चार करितात तो येथें करावा ह्म०-ऱ्ह तंत्वा ऱ्हषी असा जो लोक अुच्चार करितात तो येथें समजावा. या वर जो रेफ देतात त्यामुळें याचा अुच्चार छिन्न होतो. ह्म०-निर्ॠती या प्रमाणें पण हा आहे चुकलेला अर्धा मला अुदा० देण्यास उपयोग होत आहे. माझें येथलें व आहे. तें निरृतीचे व्याख्यानांत स्पष्ट होअील. तात्पर्य ही रराची बाराखडी ह्मणजे अेकेरी अक्षराची यांत जोडाक्षराचें प्रयोजन काय जोड ह्म०-ऱ्ह ऱ्ह अृ दोन व्यंजनें अेक स्वर तेव्हां हें जोड झालें तस्मात् हें खोटें आतां ७ नं०- पितळ्याची अंगठी ऌ हा लेख ठीक आहे. पण अुच्चारांत स्वरांपैकीं जो रकाराचा अुच्चार होतो ह्म०-ऌ याला ॠ स्वर लावला असतां ऌ असा जो लोक ह्मणतात् अुदा०- व्याकरण सूत्रांत् ऌ दृ

शेषेच लृटः सद्वा स्यतासी लृ लुटोः वगैरे ओळख-
पतात् तो जोडा ंचा होतो. ह्मा० लृ र् ऋ हें त्या
अुच्चाराचें पृथक् करण केलें तेह्वां अेकेरी अ-
क्षराचे बारारवडींत जोडाक्षरा ंचा अुच्चार कां
असावा. अहो तें जोड नाहीं नाहीं कसें २ व्यं-
जनें व १ स्वर ह्मा० सें जोड झालेच १ व्यंज-
न व अेक स्वर अेवढ्यानें मात्र जोड होणार ना-
हीं हें अुदा० जस्ताचे अंगठीत पहा. जोड आ-
हे तें ह्मा० र् लृ आणि ऋ हा स्वर आहे. तर
मग पितळ्याचे अंगठी चा अुच्चार कसा करावा
तर ९ नं० सोन्याचा सल्ल्या प्रमाणें ह्मा० क्लृप्ति
शब्द प्रथमाक्षर यांतील वर्चो भागांत क् कार
आहे तो रद्द करून खाल चा भागांत जो दिसतो
आहे त्या चा अुच्चार समजावा. दुसरें अुदा०-
अ आि अुण् ऋ लृ क् हें दुसरें सूत्र याचें
द्वितीयाक्षर लृ याला कोणी विद्वान् रकार युक्त
अुच्चार करितात् व कोणी रकार रहित करिता-
त् तर या प्रसंगीं दुसरा पक्ष ग्राह्य समजावा.
प्रथम पक्षाचे लोक जो करतात त्याचा लेख
असा असला पाहिजे. लृ आणि येथे तर लृ
असा आहे यांत रकाराचें मिश्रण नाहीं ह्मा०
अेकेरी अक्षर आहे ह्मणून यास लेलाचे बारा
खडींत ५ नंबरीं जागा देणें योग्य ठरेल.

७ नं०- कांशाची अंगठी कृ ही होय हें जोडा-
क्षर कू र् आणि अृ हा स्वर निर्दोष पणहा ले-
ख कधीं कोठें चा ही वेदांत पाहिला नाहिं तर
मग अैकिवांत कसा यावा. महाराज घावरूं न-
का निराश होअूं नका वेदाच्या बाहेरचें मी आ-
पणांस कांहीं दाखवीत नाहीं. सर्व वेदांतलें
आहे कोणास माहीत नसेल तर करून देणें कृ-
ष्यांनियानं हें वेदांत आहे का तो अुच्चार आ-
णि हालेख समजलेत. पण कथलाचे अंगठी-
ला या प्रमाणेंच करितात् ती मात्र चूक आहे.
आतां ७ नं०- जस्ताची अंगठी लृ हें जोड आ-
हे ल् र् आणि अृ हा स्वर तेव्हां जोड ठरलें
यांचा अुच्चार पितळ्याचे अंगठीला करितात
ती मात्र चूक होत आहे. तेथें रकार दाका चा कां-
लेखांत नाहीं ह्मणून आणि येथें तर ध्यावया-
चा कां लेखांत आहे ह्मणून ल्ट दृ शेषेच लृ द-
सहा हे लेख चुकीचे आहेत यांत रकार नस-
तां अुच्चार करतात् याला चूक ह्मणतात व-
सालेख करणें ह्म०- लृ दृ शेषेच लृ घ स-
हा असा पाहिजे. आतां ७ नंबर तांब्याची
अंगठी ह्म०- क्लृ हें होय हें तरओड आहे
क् ल् आणि अृ हा स्वर २ व्यंजनें १ स्वर
जोड निर्विवाद आहे हें अेखादें पोर देखील

सांगेल. पण आमचे पंडितजी याला जोड नाहीं ह्मणतात् कां तोंडांनीं ह्मणतात् पण मनानी मानीत् नाहींत् ह्म०- मनस्येकं वचस्येकं तास्यै ताळा नाहीं शा०- ताळा बसला धाब्यावर मनाच्या व उच्चाराच्या संबंध काय आमचें शा० खरें तें खरें शास्त्र कोणचें दादोबा ठीक आहे पण चमत्कार हाकीं क्रु हें जोड आहे हें सर्व जग कबुल करील पण यालाच ७ नं० ऋ स्वर लावला ह्म०- क् ल् हीं २ व्यंजनें आहेतच पण स्वर जो लावतां त्यांत १ र व्यंजन आहे तेह्मां तीन व्यंजने होतात व शेवटीं स्वर हाच वथा बिन तक्रार असल्या शिवाय गतीच नाहीं ३ व्यंजनें व १ स्वर अेवढी सामग्रीच्यास सिध्य झाली. तथापि त्यायाला धाब्यावर बसवून हें सर्व नाकबूल. मग कबूल काय हें जोड नाहीं ह्मणतात. अेहो व्यंजन १ माफ करतों तरी २ शिलक आहेतच तेह्मां जोड कबूल केलेंच पाहिजे. असें असतां हें कबूल नकरणारे पंडतजी कोण तारा खालच्चीं मांजरें कोणाच्या ज्याच्या लेख पाकतात त्याचा जे विद्वान मनाचा आणि वाचेच्या संबंध काय असें ह्मणणारे त्यानां त्याप ह्मणजे काय हें कसें कळणार लेख असला ह्म०-

झालें सत्य किंवा मिथ्या हें पाहण्याची जरूर
काय. लेखकु ठेखांटा असतो का. छापील कागदावर
रजिष्टर केलेलीं खतपत्रें खोटीं ठरतात् हें यांना काय
महीत. विद्वज्जनहो याचा विचार करा दुसरें सांग-
तों तुमच्या निबंध पहा. कोणचाहि जोडाक्षरामागें
दीर्घ ह्म० द्विमात्र अक्षर आलें असतां तें चतुर्मा-
त्र होत असतें अुदा० - चास्कंस. आचार्य या द्वों-
होंतला या ह्रा चतुर्मात्र होतो. त्याप्रमाणें हें चाक्रूसे
केमस्तेन चाक्रूसे या क्रू अक्षराचा मागच्या जो
चा हा द्विमात्रच ह्मणतात् तो चतुर्मात्र कां ह्मणूं
नये. त्यास याला चुकी ह्मणतात् ॥ अथवा खिळा
ह्मणून आपण तांब्याचे अंगठीस जो अुच्चार
करितां तो कोरखंडाचे अंगठीस योग्य होय कारण
त्याच्या मागें ३ व्यंजनें स्पष्ट दिसत आहेत् ह्मणजे
क् ल् र् अ याच्या अुच्चार क्रू हा रकारात्मक
होय. महाराज आणखी १ चमत्कार दाखवितों
कथल्याचा सल्ला १ नं तिकडे लक्ष द्या. ह्मणजे
तांब्याचे आंगठीचें व याचें स्वरूप थाटाला समस-
मान दिसत आहे - पण कथलाचा रंग पांढरा. तां-
ब्याचा रंग तांबडा असतो. यांत भ्रांत नाहीं पण
यांतहि बदल असतो कसा. अंगठीला खडा
असतो आणि सल्ल्याला न० पैलु असतात अ-
सें ओळखीकांत महदंतर असतें मग येथें सारखें

कां दिसावें बाजारांत नेलें असतां अर्धे लोक ह्म-
णतात् ही तांब्याची अंगठी आहे दुसरे ह्मण-
तात् छे छे हा कथलाचा सल्ला आहे तेव्हां यां-
त गाजर पारखी कोण व रत्न पारखी कोण.
यांत जबर दस्त चूक आहे. कथील ह्म०-कही
ऐकेरी अक्षराची बाराखडी तेव्हां यांत क्
हें अक्षरजोड आहे. ह्म०-क्ष क्ष ... क्ष
शीतलें तें या ऐकेरी अक्षरांतजमेस धरणें ह्म०
बक्र्याचा कळपांत ह्मैस आणून घालणें आ-
णि ही बकरी आहे असें प्रतिपादन करणें. ह्म-
शीला बकरी ह्मणणें याला प्रमाण काय. दादोबा
ठीक आहे. याचें पृथक् करण क् ल् अ दादोबा
शब्दाचा अर्थ ह्मसोबा ह्म०-काळोबा ह्म०-
कोणी १ व्यक्ती. स्वाभिमानी मंडळी पैकीं क-
ळसा ह्मणतात् तसा आतां सल्ल्याची परिक्षा
३ सं० कथलाचा सल्ला ताव देण्या करितां मिस्त्रे
घेऊन त्यांस टाकला. कांहीं वेळानें मिस्त्र्यांत
पहातां कोठें दिसला नाहीं तेव्हां अरथांत पळू
गेला. कारण जात लपवल्या बद्दल फार ढिकल्या
होते असें ह्मणतात. आतां परिक्षेची मानगड
राहिली नाहीं. तांब्याची अंगठी ७ सं० परिक्षा
घेण्या करितां समोर आणून उभी केली. आ-
णि मिस्त्रियांचे वेरवाजून आगे रवरें बोल आतल

चूंनको. असें बोलतांच ती थरथरां कांपूं लागली. तेव्हां तिला अभय दिलें आणि सांगितलें सख्या-ची फजिती पाहिलीस ना. ती ह्मणाली खरें सांग तें ऐका तिची जबानी प्रश्न तूं कोण आहेस अु-त्तर मी ॡ आहें तूं कोणाचा घराण्यांतली अु०-ॡ ह्मणून १ जोडाक्षर आहे त्याचा प्र०-तूं क-धलाच्या सख्याचें सोंग कां घेतलें आहेस अु०. मी कोणाचेंही सोंग घेतलें नाहीं. प्रश्न तरसग तूं त्याचा सारखी हुबेहुब कां दिसतेस. अु० त्यानेंच माझें सोंग घेतलें होतें. अुघडीक होणार तेव्हां तर पळून जावें लागलें प्र०-तूं या स्थानांत ह्म०-नंबरांत कोणाच्या मता प्रमाणें बसली आहेस अु०-जुने व्याकरणाच्या. प्र०-तुझ्या शरीरांत काय काय आहे. अु०- अेक ऌ दुसरा ॡ व तिसरा तु-मचा स्वर. प्र०-तुझ्या शरिरांत जुन्या मताच्या स्वरापैकीं ऋ हा स्वर कोठें दिसत नाहीं याचें कार-ण काय अु०- तुमचा मता प्रमाणें आहे ह्मणून. ह्म०-६ पण जगांतील अेखाद्यास प्रश्न कराकिं कला ॡ लावा ह्म०- हा खरा न लावतां जो खो-टा ह्म०-लृदृः सद्दा यांत लिहितात तो लावून ॡ या प्रमाणेंच लिहून दाखवील. असाच जुने मताचा सांप्रदाय आहे कीं, अुच्चार अेक व लेख अेक. त्यास माझा ना अिलाज आहे. पण मा झें

चूंनको. असें बोलतांच ती थरथरां कांपूं लागली.
तेव्हां तिला अक्षय दिलें आणि सांगितलें सख्या-
ची फजिती पाहिलीस ना. ती ह्मणाली खरें सांग
तें ऐका तिची जबानी प्रश्न तूं कोण आहेस अु-
त्तर मी ॠ आहें तूं कोणाचा घराण्यांतली अु०-
ॠ ह्मणून १ जोडाक्षर आहे त्याचा प्र०-तूं क-
धलाच्या सख्याचें सोंग कां घेतलें आहेस अु०.
मी कोणाचेंही सोंग घेतलें नाहीं. प्रश्न तरमग तूं
त्याचा साररवी हुबेहुब कां दिसतेस. अु० त्यानेंच
माझें सोंग घेतलें होतें. अुघडीक होणार तेव्हां
तर पळून जावें लागलें प्र०-तूं या स्थानांत ह्म०-
नंबरांत कोणाच्या मता प्रमाणें बसली आहेस अु०-
जुने व्याकरणाच्या. प्र०-तुझ्या शरीरांत काय
काय आहे. अु०- अेक कृ दुसरा ऌ व तिसरा तु-
मचा स्वर. प्र०-तुझ्या शरिरांत जुन्या मताच्या
स्वरापैकीं ऋ हा स्वर कोठें दिसत नाहीं याचें कार-
ण काय अु०- तुमच्या मता प्रमाणें आहे ह्मणून.
ह्म०-८ पण जगांतील अेखाद्यास प्रश्न करा किं
कला ऌ लावा ह्म०- हा खरा न लावतां जो खो-
टा ह्म०-ऌट: सद्दा यांत लिहितात तो लाहून
कॢ या प्रमाणेंच लिहून दाखवतील. असाच जुने
मताचा संप्रदाय आहे कीं, अुच्चार अेक वलेख
अेक. त्यास माझा ना अिलाज आहे. पमसाझें

मत माझे तसें नाहीं प्र०- तरमग तुझें मत कसें आ-
हे- तुमच्या मता प्रमाणें. प्र०- माझें मत तूं जाण-
तेस अु०- हो. प्र०- तर मी या लेखा च्या अुच्चार
कृति शब्दा प्रमाणें च करणार अु०- तसा च केला
पाहिजे. जर लोक मता प्रमाणें रकारा च्या अुच्चार
करणे वरल्यास तूं सांग कसें घेतलें पाहिजेस तें सां-
ग. अु०- कू माझे शेजारीं ७ नं० चा सारखंडा-
ची अंगडी आहे ती पहा तेव्हां मी म्हटलें गाबा-
याबास खरें बोललास. तीं ... अंगडी
अंगडी आहे यांत जुन्या मता प्र- कृ लृ ॠ ह्म० हे
न ... आणि तिसरा व्यंजन रूपी र स्वर या
प्रमाणें आहे तर याचा अुच्चार जो लिहिवानें हो
तो तो असा १ कृ १ लृ आणि ॠ ... ॠ मध्ये
अुच्चारांत रकार येतो ... हा ऋ तेव्हां र व्यंजनें हो-
तात व चवथा स्वर ह्म० कृ लृ ऱ् ॠ अे वरे मि-
ळून अुच्चार केला पाहिजे व लिहिला पाहिजे प-
हिजे. कसा कू आतां असा अंगडीचा कोष्ट-
काचा फजिता अुडाला तसा ८ नंबरांत ८ कोष्ट-
त नवीन्चा फजितवाडा समजावा. आतां ... नं०
सोन्याच्या सह्ला हैं कोष्टक जुने १६ स्वर त्या प-
ख्यलीला धरून मांडलें आहे हें सर्वस्वी खोटें आ-
हे कारण हें सातव्या नंबरच्या स्वराचा हक्काचे
आपण शास्त्रानीं असेस धरिलें म्हणून त्यांचे

यथावत वर्णन करितों. विद्वज्जन हो पहा ऐके-
काचे खांद्यावर चार चार व्यंजनें बसलीं आहेत्
तथापि त्यांस जोड ह्मणण्याचा हुकूम नाहीं. आ-
तां ९ नं० सल्ला हा सोन्याचा ह्मणतात पण ल्ह
हें व्यंजन आहे व हें पितळ आहे ह्म० ७ नं०-
ची पितळ्याची अंगठी आहे याचें पृथक् केलें
असतां ल् र् अ् असें आहे ९ नं० कथला या
सल्ला ही चूक आहे हि तांब्याची अंगठी आहे.
ककाचे बारास्वडींत आहे म्हणून जोड नाहीं असें
ह्मणतात् पण जोड आहे पृथक् क् ल् र् अ् ३
व्यंजनें १ स्वर आहे तस्मात् जोड झालें ९ नंबर
रुप्याचा सल्ला ल्ह र ह्म० ऐकेरी अक्षराची
बारास्वडी त्यांतलें हें अक्षर तथापि जोड आहे
पृथक्० र् ल् र् अ् ३ व्यंजनें १ स्वर तस्मात्
जोड झालें ९ नं० पितळ्याचा सल्ला ल्ह हें ल ला-
चे ह्म० ऐकेरीचे बारास्वडींत आहे. ह्मणून
शास्त्र यास जोड कबूल करण्यास भिडावतें ह्म०-
सरसतें ह्म०-लाजतें पृथक्. ल् ल् र् अ् ३ व्यंज-
नें १ स्वर महाराज या झालेल्या ४ सोळा स्वड्या
या जोडाक्षराचा नसतां १६ कोष्टकें प्रत्येकाचीं
पूर्ण करितां येत नाहींत. तेव्हां जोडाक्षरें भरीला
घालून पूर्ण केल्या आहेत् हा केवढा अन्याय आहे
आतां या पुढें उदाहरणार्थ ३ जोडाक्षरांचा व-

मत माझे तसें नाहीं प्र०- तरमग तुझें मत कसें आ-
हे. तुमच्या मता प्रमाणें. प्र०- माझें मत तूं जाण-
तेस अु०- हो. प्र०- तर मी या लेखा च्या अुच्चार
कृति शब्दा प्रमाणे च करणार अु०- तसा च केला
पाहिजे. जर लोक मता प्रमाणें रकारा च्या अुच्चार
करणे वरल्यास तूं सांग कसें घेतलें पाहिजेस तें सां-
ग. अु०- कृ माझे शेजारीं ७ नं० चीं लेखंडा-
ची अंगठी आहे ती पहा तेव्हां मी म्हटलें शाबास
शाबास खरें बोललास. तीतीर ने अंगठान
अंगठी आहे यांत जुन्या मताप्र. कृ लृ ऋ ह्म० दो
न व्यंजनें आणि तिसरा व्यंजन रूपी र स्वर प्र-
माणें आहे तर याचा अुच्चार जो लिपीबानें हो
तो तो असा १ कृ १ ह्र आणि ऋ करणा ऋ मध्यें
अुच्चारांत रकार येतो तो हा र तेव्हां २ व्यंजनें हो
तात व चवथा स्वर ह्म० कृ लृ र ऋ अैवढे मि
ळून अुच्चार केला पाहिजे व लिहिला पाहिजे
पाहिजे. कसा कृ आतां असा अंगठीचे कोष्ट-
कांत कजिता अुडाला तसा ८ नंबरांत ८ कोष्ट-
त नवरीच्या फजित वाडा समजावा. आतां ४ नं०
सोन्याच्या सल्ला हें कोष्टक जुने १६ स्वर त्या प-
द्धतीला धरून मांडलें आहे हें सर्वस्वी खोटें आ-
हे कारण हें सातव्या नंबरच्या स्वराचा हक्का च
आपण शास्त्रानीं असस धरिलें म्हणून त्यांचे

यथावत वर्णन करितों. विद्वज्जन हो पहा ऐके-
काचे खांद्यावर चार चार व्यंजनें बसलीं आहेत्
तथापि त्यांस जोड ह्मणण्याचा हुकूम नाहीं. आ-
तां १ नं० सल्ला ह्रा सोन्याचा ह्मणतात पण ल्ह
हें व्यंजन आहे व हें पितळ आहे ह्म० ७ नं०-
ची पितळ्याची अंगठी आहे याचें पृथक् केलें
असतां ल् र् ऋ असें आहे १ नं० कथला वा
सल्ला ही चूक आहे हि तांब्याची अंगठी आहे.
ककाचे बाराखडींत आहे म्हणून जोड नाहीं असें
ह्मणतात् पण जोड आहे पृथक् क् ल् र् ॠ ३
व्यंजनें १ स्वर आहे तस्मात् जोड झालें १ नंबर
रुप्याचा सल्ला र्ल्ह र ह्म० ऐकेरी अक्षराची
बाराखडी त्यांतलें हें अक्षर तथापि जोड आहे
पृथक्० र् ल् र् ॠ ३ व्यंजनें १ स्वर तस्मात्
जोड झालें १ नं० पितळ्याचा सल्ला ल्ह हें ल ला-
चे ह्म० ऐकेरीचे बाराखडींत आहे. ह्मणून
शास्त्र यास जोड कबूल करण्यास भिडावतें ह्म०-
सरमतें ह्म०-लाजतें पृथक्. ल् ल् र् ॠ ३ व्यंज-
नें १ स्वर महाराज या झालेल्या ४ सोळा रवड्या
या जोडाक्षराचा नसतां १६ कोष्टकें प्रत्येकाचीं
पूर्ण करितां येत नाहींत. तेव्हां जोडाक्षरें भरीला
घालून पूर्ण केल्या आहेत् हा केवढा अन्याय आहे
आतां या पुढें उदाहरणार्थ ३ जोडाक्षरांचा व-

१ तीन अक्षरें जोड अशा चार राहिलेल्या घेतों ९ नं०- कासें सल्ला क्लू यास शास्त्र २ व्यंजनें कबूल करितें पण ती चूक आहे. पृथक् क् र् ल् र् अ २ कबूल असतां ४ निघालीं ९ नं० जस्त सल्ला जोड कबूल ल्‍ू पृथक् ल् र् ल् र् अ झाडा घेतां दोहोंचीं ४ निघालीं ९ नं०- तांबेसल्ला क्लू पृथक् क् ल् ल् र् अ दोहोंचीं ४ प्रत्येक अक्षरांत अकेक २ दोन फाजील निघत आहेत् ९ नं०- लोखंडसल्ला क्लू हें मात्र शास्त्रास ३ व्यंजनाचें कबूल आहे पृथ क् क् ल् र् ल् र् अ तिहीं चीं ५ निघालीं महाराज आमचे डोळ्यांत धूळ टाकल्या प्रमाणें होत आहे. आंगठीच्या खडा मोडू नतरी पुढें कराची होती मग सल्ला आहे असें म्ह- णाचें होतें. सात नं०- चा जो स्वर म्ह०-ॐ अ तोच ८ नऊ १० नंबर पर्यंत प्रत्येक बारा खडींत वेधकें रूप करून तोच स्वर पुनःपुनः नाचवला म्ह० ८ हा ८ बारा खड्यांत ३२ घरीं नाचवला. हा अन्याय नाहीं काय? जर आपणा जवळ १२ च स्वर होते तर जबरदस्तीनें १६ करण्याचें काय कारण होतें. या प्रमाणें सल्ल्याचा कोष्टकाचा फजिता झाला. असाच पुढें १० नंबरचे कुडुक त्याचाही फजिता समजावा. यांत फेर मिळून अवढाच कीं, हिं सर्व अक्षरें हि मात्र होत या

८ सोळा खंडयांत ५२ चुक्या दाखवल्या तथापि अेक देखील शास्त्री लोकांस कबूल होत नाहीं हें आश्चर्य नव्हे काय. किंवा मला च भुरळ पडली आ.हे न जाणो. हेंच कोष्टक पुढें बिनचुक देअीन तेह्वां सर्व ध्यानांत येअील. हें कलम फार विस्तारलें मा झा नाअिलाज आहे. माफ करा. कलम २

दुसरें- ञ हा अुच्चार चुकी चा आहे. हें प्रथम सिद्ध करून नंतर खरें काय हें दाखवाचें ॥ प्रथम च छ ज झ ञ हा वर्ग अुच्चार करिते वेळीं जीभ कशी हलते व कोठें कसा स्पर्श करिते. याचा अनुभव पहावा ह्मणजे असें ध्यानांत येअील कीं, ४ अक्षरांचे वळेस जसें चालन करिते त्या प्र०- पांचव्या ञ चा वेळेस करीत नाहीं हें अेक. व दुसरें असें कीं, याच प्रमाणें प्राकृत जो च वर्ग आहे. तो ह्मणावा आणि त्याचाहि ताळा असाच पहावा. चोहों प्रमाणें पांचवें येत नाहीं. तिसरें असें आहे कीं, जसे संस्कृत प्राकृत २ वर्ग आहेत तसाच तिसरा १ महा प्राकृत वर्ग आहे हा कोठून आणिला व याचा अुच्चार कसा कराचा असें कोणी साहजिक ह्मणतील तर शषस हीं अक्षरें अेकाच जातीचीं आहेत् पण भिन्न स्थानीं जिभेचा स्पर्शामुळें त्यांत ३ भेद झाले आहेत् त्याप्रमाणें या अुदा०- वरून असें समजलें कीं, संस्कृत प्राकृ-

न महा प्राकृत हेजे ३ वर्ग आहेत ते या शषस चे बंधुअया पैकीं आहेत् कशावरून तर याचें त्या-चें साम्यकार येत आहे. साम्य कोणचें स आणि प्राकृत च हे दंती आहेत् श आणि संस्कृत च हे तालव्य आहेत् तर याजवरून असें सहज होतें कीं, यांत तिसरा ष आहे व तो मूर्धा आहे तसा त्यांतहि असावा. असें वाटल्यावरून अुच्चार करून पाहिला व तो सांपडला. त्याचा लेख च असा करितों कारण ष चा मावस भाअू आहे आणि ष प्रमाणें मूर्धा स्थानचाहि आहे तेव्हां ओळखण्या करितां त्याचे मागें पोकळ टिंब देतों त्यावरून महा प्राकृत ओळखावा. याचा अुच्चार ष प्रमाणें मूर्धा स्थानचा करून पहातां चं छं जं झं ञं हीं पांची अक्षरें निः संशय सांपडलीं. या प्रयत्नावरून ध्यानांत येअील तर अथवा माझी भेट होअील तर या शिवाय दुसरा अिलाज नाहीं. आणखीं अेक प्रमाण आहे पण सांपडणें कठीण. कोणी मनुष्य बोबडे असतात त्यांस हे संस्कृत प्राकृत दोन्हीं वर्ग येत नाहींत ते महा प्राकृत वर्गाचा अुच्चार करितात् असे मला आज पर्यंत दोनच अढळले व याच्या खोटेपणा बद्दल आणखीं १ प्रमाण संस्कृत ञ हा खरा मानला तर प्राकृताचा पंचम कोण असें विचा-

किलें असतां तोच ह्मणून दाखवितात् ह्या अन्या- य होतो तर प्राकृताचा अ तो भिन्न पाहिजे व त्या स्थानचा असला पाहिजे तो नाहीं तसाच ति- सरा वर्ग जो महाप्राकृत त्याचाहि अ भिन्नच पाहि- जे. तोहि कोणाजवळ नाहीं तस्मात् तो खोटा आ- हे. कोणी ह्मणतील कीं, तिन्हीं वर्गाला अेकच अ असला ह्मणून काय चिंता आहे असें ह्मणणें कदापि चालावें नाहीं कां अनुस्वारस्य ययिपर सवर्णः असें जें सिद्धांत सूत्र आहे त्याला ताळा मिळाला पाहिजे ना तो कसा. संस्कृत मुंज याश- ब्दांत जो अकार येतो तो संस्कृतांत पंचम आ- ला पाहिजे व तोच येतो. तसा प्राकृत गुंज शब्दामध्येंच जो निबंधा प्रमाणें पंचम येतो त प्राकृतास दंतीच पंचम येणार व तो येतो याव रून महाप्राकृताचा उच्चार करूं. गुंज ह्मणजे मूर्खी. तर या वेळेस त्याचा जो परसेश्वराकडे च पंचम आहे तोच मध्यें येणार. यावरून तिन्हीव र्गाचे पंचम भिन्न असलेच पाहिजेत असा सि- द्धांत ठरला. तुमच्या अ चे ३ उच्चार करितां येत नाहींत तस्मात् तुमचा अ खोटा. अेक सर्वत्र निबंध असा आहे कीं, कोणचाहि अ- नुस्वाराचा पुढें कोणचाहि वर्गाचें कोणचें- हि अक्षर आलें तरी त्या वर्गाचें पंचमाक्षर

लीन होऊन असल्या वांचून साहजीक मध्येंअु·
च्चार होतें. यद्य· पांचीवर्गांचा तोंड क व
र्ग. चव. टव. तव. पव. निबंध आच्या. या प्र·
अकृत मुद्दा. याच्याहि समावेश जाणावा. हें
मागें सांगितलें आहे. अुंज या शब्दांत तुम्हांचा
अ मुखीं येत नाहीं का खोटा म्हणून अुदा·
पंचम अंजन वांछा यांत तुमच्या पंचम येत
नाहीं तस्मात् तो खोटा. अशीं लक्षावधी अु·
आहेत. आतां कोणी असें म्हणतील कीं, पंचम
मध्यें येत नाहीं ही सर्व लोकांची चूक आहे.
आम्हांसी आज पर्यंत जो जो आहे तोच
खरा आहे. व त्याला सूत्राच्या आधारहि आहे.
तस्मात् तोच खरा आहे. तेव्हां तो म्हटलाच पा·
हिजे. मुञ्ज अञ्जन वाञ्छा या अु
च्या करणाण्ड या प्र· सरवेद म्हटला पाहिजे.
गोभिरञ्जनो औञ्जो यूपं सा ञ्जेयो हीं
अशीच म्हटलीं पाहिजेत् असें सर्व शास्त्रीलो·
क म्हणतात् त्यावर अुत्तर हीं सर्व अुदा· दि
लेलीं सर्वस्वीं खोटीं आहेत हें बोलणें साहस
वाटेल. परंतु मी न्याया वांचून कोणचेंहि प्रति·
पादन करित नाहीं जरी अुदा· खोटीं आहेत्
तरी तीं शुद्ध करून माझे वर्त्तीची साक्ष देतील
असें करीन. असें पहा. पहिले व्यंजनाचे ५ वर्ग

आहेत. त्यांतून कोणतेंही अुदाहरण घेऊन पहा.
अंक शंख अंग संघ या शब्दांत पंचम ह्म०- ङ.
हा मध्यें अुत्पन्न होतो व ट वर्गांत अुंट सुंठ दंड
षंढ यांत पंचम ह्म०- ण व तवर्गांत संत पंथ बंद
गंध यांत पंचम ह्म० न पवर्गांत संप गुंफा अं-
बा शंभू यांत पंचम ह्म०- म या सर्व शब्दांत पं-
चम आले आहेत् त्या प्रत्येकाचें वजन समसमान
ह्म०- तो कथामध्यें अेक मासा या प्रमाणानें आ
हे सूक्ष्म विचारानें पहावें आणि जुने व्याकरणाचा
तमा प्र· तर ६ मासे वजनाचे येतात् ह्म०- अंन्स,
षण्मास यांतील नकार व णकार पहावे तेव्हां अेक
मासा कोठें व ६ मासे कोठें वर विरुध पक्षाचीं अु-
दाहरणें आहेत तीं पहा. जगांत कायतीं ५ पांचच
आहेत् तीं गोभिरेञूञ्मो अेञूञ्मोयूपं याञूचा
सा अंजयो हीं अेवढींच आहेत् वेदांत् याचा
बाहेर धिकू ताञूच तञूच मदन ञूच अिमाञू
च माञूच हीं अेवढीं आहेत् आणि अेक मा-
शाचीं तर कोट्यावधी ह्म०- सर्व वेद भरला आहे
तर तुमचीं निबंधा विरुध ह्म०- शास्त्र व व्यवहा-
र याला सोडून आहेत् तस्मात् हीं सर्वस्वी खोटीं
शास्त्री ह्म०- आमचींच खरीं तुह्मीं जो पंचम
ह्मणत नाहीं ही सर्व तुमचा लोकांची चूक होत
आहे. अुत्तर तुमचा जो पंचम ञ तो मुंजे अंज-

न अित्यादि शब्दांत मुळींच थोपभाहीं व बुद्ध्यां
अभिमानानीं ञ आणाल तर खोट्या ञ सहावासे
ञा शिवाय कधींहि ह्मणतां येणार नाहीं. टा-
कलात तर मुळींच जाणार, घेतलात तर ६ मासे
येणार याचें कारण काय तर तुमच्या ञ मुळींच
खोटा. हेंच नाहींतर आमचीं उदाहरणें पहा.
संप्र कंठा मंत्र शंभू कुंज अंजन वगैरे हजारों
आहेत यांतला पंचम टाकण्या विषयीं कितीही प्र-
यत्न केलात तथापि तो १ मात्रा केव्हांहि जाणार
नाहीं. हा पक्का सिध्धांत समजावा. कारण आम-
च्या खरा हक्कदार शब्दोक्त आहे. ह्मणून आम्ही
गोभिरैञ्जमः अित्यादिवर खोटीं झालीं आहेत
तीं दाखवतों. हीं लिहिलेलीं सर्वा शुध्ध आहेत्
अ०. र वर अनुस्वार पाहिजे मात्रा नकोत् अ०.
गोभिरंज्मः असेंच पाहिजे यांत प्रयत्ना वांचून
पंचम येतच आहे ओढून ताणून चंद्र बळ नको
दुसरें ब्राह्मणांतील   औञ्ज्मो यूपं हें महाअ-
शुध्ध   अं पाहिजे. तेथें औ कशी चालेल अंज्मो
यूपं असें पाहिजे. तिसरें साञ्जयः असें असतें
तें सांजयः असें पाहिजे. सर्सृजया यतुर्वंश असें
आहे त्याचें भरद्वाजान् छांजेयः असें झालें
यांत खोट्या ञचें अह्मी कांहीं लागत नाहीं वि-
ष्णु सहस्त्र नामांत १ बंड आहे तें शार्ङधन्वागदा.

धर: असें कित्येक पुस्तकावर आहे. व शार्ङ्ग असेंहि आहे. हें कांहीं शा० विचारिलं शार्ङ्ग हें धनुष्याचें नांव आहे. असें सांगितलें पण मला तें खरें वाटलें नाहीं. तें धनुष्य शृंगाचें असावें ह्मणून त्याचें नांव शांर्ग असें झालें असावें यांत पंचम सूक्ष्म येतो च आहे. आह्मीजरी लिहिला नाहीं तरि शृंग हा जो अनुस्वार तो शा वर द्यावयाचा आणि गवर रेफ ह्म० जसा शृंग तसा शांर्ग यांत अह्मास लेखांत ङ ची मुळींच गरज नाहीं. अुच्चारांत सिधांता प्र० सूक्ष्म येतोच आहे अतां कित्येक असें ह्मणतील ङ मध्यें काढला असतां काय अडचण आहे. अुत्तर अडचणतर मोठीच आहे. कलकत्यास जीं पुस्तकें छापतात् तीं या मता प्रमाणें असतात तीं मला कबूल आहेत् कारण निबंधा प्रमाणें त्यांचे लेख असतात ह्मणून. ते कबूल करावेलागतात. पणु सगळ्या सहस्र नामांत कोठें नसतां शेवटच्या पत्रावर अेकाच ठिकाणीं लिहिणें हा अन्याय ह्म० अज्ञान पणा होय. हें झालें ङ बद्दल आतां पुढें कांहीं काळानी कोणी सुधारक परोपकार बुद्धीचे भेटले त्यांच्या अवलोकनांत हा त्रिशंकू लोंबकाळत आहे याचा अुद्धार करावा असें मनांत येअून त्याला सोडवला त्रिशंकू ह्म० ग याला हांकून लाविला आणि आमट्या जोड त्याची

त्याची स्थापना धन्याच्या जागेवर केली हा अन्याय कशाच्या निबंधा विरुध्द ड. छ०-पंचम मध्यें काढ- ण्याचा तात्पर्य खरा जाऊन खोटा आला हा अन्या- यलहान आहे काय. सगळ्या सहस्र नामांत कोठें नसतां ओकेच ठिकाणी लिहिणें हा अन्याय तर झालाच पण चूक कबूल न करितां प्रतिपादन कर- णें हा तर मझा अन्याय. प्रथम ड. व ञ अर्धा ले काढूं लागले लोकानीं प्रथमच निषेध न करितां गौ- रव केला वहिवाट झाली पुढें गला घालवून ड. काअीम झाला. त्या प्रमाणें ञ् प्रथम अर्धा वहि- वाट झाल्यावर ञ सगळा झाला. सार्जजयो अ- सें कित्येक पुस्तकांवर आहे. ह्मणून कित्येक वैदि- क ह्मणतात् भरद्वाजान् छांर्जयो अभ्ययष्ट हीं ११ आहेत् पण ञ सगळा धरून बारा आहेत असें ह्मणतात् असे या पंचमा पासून अन्याय झाले दीडशें वर्षांची पोथी संहितेची १ पहाण्यांत अली त्यांत हें पंचमाचें बंड नाहिं गोभिरंज्मो मदायकं अ- सेंच आहे. या ञ बद्दल अेक कथानक आहे त्यांत मोठा मुद्दा आहे तें येथें सांगितल्यास असं- गत होणार नाहीं. अेके गृहस्थानें प्रश्न केला प- रमेश्वराचा घरचा असें मागें गेलें आहे. त्याचा अर्थकाय चिठ्या टाकून तुमचा मताची आलि किं- वा काय अुत्तर- ती मोळ्या लोकांची कल्पना आ

हे. तसें नाहीं येथें प्रत्यक्ष परमेश्वराकडून साक्षी
दार येऊन अमचा मताला साक्ष देऊन गेला. कां-
हीं वर्षांमागें आमचे गावांत स्न॰ आगाशीत स-
भा मंडळींत या संबंधी वाद विवाद होऊन असेंठर-
लेंकीं, परमेश्वरानीं माझें मताची साक्षदिली अस-
तां तुह्मांस मान्य होईलना. ते ह्मणाले स्वप्नांतील
दृष्टांत असल्यास मान्य होणार नाहीं जागेपणचा
मान्य होईलना तें त्यांनी कबूल केलें नंतर अेक
गृहस्थ गावांतच होते त्यांस घेऊन आलों आ-
णि सांगितलें हा परमेश्वरा कडून साक्षीदार आ-
णिला आहे. यांचें नांव रामचंद्र गणेश जोशी.
यानां पहातांच लोक ह्मणाले आह्मांस ठकवितां
किं काय. मी॰- जबानी झाल्यावर न्याय करूं.
क ख ग घ ङ हा पंचाक्षरी वर्ग त्यांस मुळींच येत
नसे. या मुळें क वर्ग मनांतून अुच्चारीत असतां
बाहेर जो अुमटे तो स्पष्ट च वर्ग होय यथा
संख्य प्रथमास प्रथम द्वितीयास द्वितीय या प्र॰
होत असे तेव्हां पंचम जो ङ त्याचा मोबदला सा-
वंजनीक जो ञ तो न ह्मणतां जो परमेश्वराच्या घ-
रच्या चवर्गाचा पंचम आहे त्याचाच अुच्चार
होत असे तो आहे अनोळखी प्रत्यक्ष जानीं
अैकला त्यांस तें पटलें त्यांत कोणाचें कपट नाहीं
तेव्हां हें करणें परमेश्वराचें च आहे ह्मणून हा-

न्याय सर्वत्रांनीं मान्य केला. पण कित्येक लोकांस यांतलें बीज कांहीं च कळलें नाहीं ते समजत होते कीं, येथें प्रत्यक्ष स्वर्गांतून नारद येतो कीं काय ह्मणून ते आकाशा कडे अेक सारखी नजर लाअून बसले होते पण तें तर कांहींच दिसलें नाहीं आणि सभेनी तर मान्य केलें. नारद पहाण्या करितां गर्दी फार जमली होती. पुढें त्या गृहस्थास कांहीं शब्द ह्मणावयास सांगितले. अह्मी ह्मणूं तसे तुह्मी ह्मणा. काबी चाबी खडी छडी पावसा मुळें (घरांत गळून घाण झाली) झरांत जळून झाण झाली. देवळांत देवा पुढें टांगतात ती घांट. देवळांत देवापुढें टांजतात ती झांट. असें ह्मणतांच सर्व लोकांनीं हांशा पिकवला. आणि टाळ्यांचा गजर केला. सभा विसर्जन झाली. विद्वज्जन हो असा न्याय वारंवार मिळणें नाहीं तर कोणाचा दृष्टोत्पत्तीस आल्यास त्यानें बहुत जनांस प्रसिध्द करण्यास अळस करूं नये. अशी माझी प्रार्थना आहे कां कीं हा छापेतला दृष्टांत नाहीं. अथवा चिट्या टाकण्या च्याही नाहीं. असे न्याय श्रीश्वराचा कृपेनी मज जवळ पुष्कळ आहेत् कीं त्यावर अपील चालाचें नाहीं. अशें अख्यान फार झालें तथापि माझी भेट झाल्या वांचून अशा व महा प्राकृत वर्गांचा निकाल लागणें कठीण.

अुच्चाराच्या लेख करितां येत नाहीं तथापि प्रयत्न केला आहे. येथें माझा नाअिलाज आहे. कलम ३ रें निरृती येतो या शब्दाचें प्रथमाक्षर ह्म०-नि हें अेकमात्र ह्म०- ह्रस्व असतां व पुढचा रेफवाला ऋ हा शास्त्र मानानें जोड नसतां ह्मित्त ह्मणतात् ह्म०. नि या अक्षराला गुरुत्व ह्मणतात् तें संभवत नाहीं. गुरुत्व ह्मणण्याचें शास्त्र असें आहे ह्रस्वाक्षरापुढें जोड आलें असतां तें ह्रस्व द्विमात्र होतें जोड ह्म०. काय २ व्यंजनें व तिसरा स्वर ह्रस्व ह्म०-काय अेकमात्र अक्षर अशीं प्रत्येक बारा खडींत किती आहेत ४ तीं कोणचीं क कि कु कृ हीं चार ऋ यांतला रेफ हा अर्धा र् हें व्यंजन १ ऋ हा रचाला स्वर ह्म०-१ व्यंजन व १ स्वर असें अेकत्र जमवल्यानें ररा रिरी प्रमाणें साधें अक्षर होतें जोड होत नाहीं मग त्या निला गुरुत्व ह्मणण्याचें कारण नाहीं १ या लेखाचा व अुच्चाराचा ताळा मुळींच नाहीं. कदाचित् या गुरुत्वामुळें याला कोणी जोड कबूल करतील तर रराचे ह्म० अेकेरी अक्षराचे बाराखडींत याला जागा कां २ बरें ररांतलें ठरलें तर लेख ररा प्रमाणें कां नाहीं ३ तस्मात् यांत मोठी चूक असली पाहिजे. चवथें ररा चे बाराखडींत कोणचाहि अक्षरावर रेफ मुळींच येत नाहीं मग यावर कां असावा. पांचवें अआचे बा-

रा खडीस किन्त्यावर काढतात् ह्मणून त्यांतला समजावा. तर अ आ प्रमाणें तो दिसत नाहीं. ६वें. आणि अ आचे बाराखडीवर सुध्दा रेफ कोणावर ही येत नाहीं. सहा आरोप आले. तात्पर्य कोठें हि ताळा नाहीं हें का शास्त्राचें लक्षण. याचें नांव का शास्त्र. शास्त्री ह्म०- शास्त्राला कोठें ताळा असतो. का. तेंच खरें आपाखीं शास्त्रविरुध्द कित्येक प्रकार आहेत ते दाखवतों. सर्व व्यंजनें ओळीचा खालीं असतात् जोड अक्षरें लिह्मिण्याचे भेद २ आहेत् अेक प्रथमचें अर्धे अक्षर वर वदुसरें सगळें त्याच्या खालीं अु०- खड्ग मुद्गल शुक्ल. अित्यादि. दुसरा भेद- प्रथमचें अर्धे लिह्मिणारा चे डावे बाजूस वदुसरें सगळें अुजवे बाजूस अु०- व्य स्य स्व स्प वगैरे. अशी सर्व परिभाषा असतानां सर्व व्यंजना बिरुध्द अेकट्या र व्यंजनाला च बहिष्कार कां घातला ह्म०- र हें अर्धें व्यंजन त्याचें नाम करण रेफ असें करून ओळीच्यावर काय ह्मणून घातलें हें १ व दुसरें बाकीचीं जीं व्यंजनें त्यांचा नाम करण संस्काराची काय वाट लाविली व त्यांची नावें काय ठेवलीं हें कोठें अढळत नाहीं हे अन्याय दिसतात् त्यावर १ विद्वान् बोलले हा अन्याय नवे न्याय शास्त्रांत यांचा न्याय आहे. रेफस्य अूर्ध्वगतिः जलतुंबडी न्यायेन ह्म०

जळा मध्यें तुंबडी इ० वाळलेला भोंपळा टाक- ला असतां तो जसा पाण्यावर तरंगतो तसा हा रेफ वरच पाहिजे. त्यावर मी बो०. हा न्याय अर्ध्या र् व्यंजनाचा झाला पण सगळ्या र व्यंजनाचा कसा. तो सांगा पाहूं. शा०- तो मला माहीत नाहीं. मी०- मी सांगतों ऐका. समग्र रेफस्य अधोगतिः नांग- र न्यायेन इ०- नांगर तिरपा भूमींत शिरत असतो तसा आमचा समग्र रेफ प्र ग्र ब्र हे नांगराचे फाळ भुमी मध्यें शिरत आहेत त्या कडे पहा. या नांगर न्यायानी जल तुंबडी न्यायाचा पराभव केला. तो पाहून शास्त्रीबावा खट्टू झाले. विचार वंतजनहो हे न्याय पहा. संधी विषयीं विचार निः या ह्रस्व विसर्गापुढें कोणचेहि ररा पैकीं व्यंजन आलें असतां विसर्गाचा रेफ न होतां निः हें अक्षर नी असें दीर्घ होत असतें अुदा०- निः राजा नीरा- जा निः रिशादसः नीरिशा० हे तिःरु इस्य हेतीरु- इस्य निः रेकु नीरेकु निः रोदसी नीरोदसी निः रौद्रं नीरौद्रं निः रक्तस्य नीरक्तस्य महीपाल हीं जशीं ररा. रे रै रो रौ सर्व अुदा० दारववली तसेंच निःरृती याचा संधी नीरृती असाच झाला पाहिजे रृकारामुळें नीला दीर्घत्व प्राप्त होतें हा निबंध मोडून निर्रृती असा रेफ देतां तो कोणचा शा- स्त्रावरून हें सार्वजनीक शास्त्र निःपक्षपाताचे

हें कां रद्द पडलें. हा अन्याय नव्हे काय. विचारक-
रा. शास्त्री म्ह०- अहो हा रेफांचा निषेध दाखवलात
तो शरीरं वगैरे. र व्यंजना बद्दल आमचा जो आ-
हे हा ॠ स्वरावर आहे असे वेदांत शेंकडों ॠ वर
रेफ आहेत. अुत्तर. तसें जरि म्हटलेंत तरि तें हि
अशास्त्र तेव्हां त्याचें हि खंडन होणार नि: या विस-
र्गापुढें १६ स्वरां पैकीं कोणचाहि आणिलात तरिं
संहिता करताना त्याला र त्व प्राप्त होणार म्ह०-
ज्या नंबरचा स्वर आणाल त्याच नंबरचें र व्यंजना
पैकीं व्यंजन होणार. हा सिद्धांत समजा. विसर्गांचा
रेफ करणें अगदीं अशास्त्र व अयुक्त हें अेक व
पदां मध्येंजें स्वराचें रूप म्ह०- लेखतेंच संहिता
काळीं तसेंच राखणें व अुच्चारहि पदां प्रमाणेंच
संहितेंत करणें हें हि अति अयोग्य ठरत आहे.
१६ व्यंजनाचे निबंधा प्र० असतां अेकाचें असें
कां व्हावें सिद्धांताला कमी पणा येतो याचा विचार
काय. शास्त्री म्ह०- सिद्धांताला अपवाद नसतात
का मी०- दाखवा. तेव्हां त्यांनीं एक गोष्ट सांगितली
अेका गृहस्थाला परीस सांपडला त्याचा लौकिक
जगभर आहे. अनुभव व्हाण्या करितां त्याणीघ-
रांतल्या सर्व लोखंडाच्या जिनसा जमवल्या पहार
कोयता कुऱ्हाड कुदळी वगैरे आणि अेकेकास
स्पर्श केला. तात्काळ सर्व जिनसा सोन्याच्या झा-

त्या. मी० झाल्याच पाहिजेत् मग सिद्धांत कशा-
ला ह्मटला आहे. पण ही गोष्ट आमचा ज्ञनीची
ती तुह्मी कां सांगितलीत शास्त्री०-पण कुठं ची
झाली नाहीं ह्मणून. मी० ही गोष्ट खोटी शास्त्री०
दुसरी अेक सांगतों. अेके गृहस्थानीं बाजारांतून
हळद आणिली ती कुटून बारिक पूड केली ती भि-
जवून पुनः कुटली चिकण झाली त्याचे अंड्या अे-
वढाले १६ गोळे केले आणि नव ग्रहांचे ९ सांचां
त दाबून मूर्ती नंबर वार मांडून ठेवल्या व दुसरे सप्त
ऋषींचे सात गोळे दाबून त्याचा पुढें अुदक सं-
स्थ मांडून ठेवल्या व तशाच रात्रभर वाळल्या. दु-
सरे दिवशीं मौज पहाण्या करितां मंडळी जमली
आणि पूजेस प्रारंभ केला. सर्व मूर्ती पिंवळ्या रस
रसीत दिसत होत्या. अभिषेक पात्र भरून रवि चंद्र
ओळीनीं सर्वांवर धार धरिली चमत्कार असा
झाला अेकदम सर्व मूर्ती लाल भडक झाल्या हें
प्रत्यक्ष पाहिलें. मी० झाल्या असतील जादूगिरी-
नी असें होअील. पण ही गोष्ट अह्माला कां सांगि-
तली. शास्त्री०- पण केतूची मूर्ती झाली नाहीं पिं-
वळीची पिंवळीच राहिली असे अपवाद ठिकठि-
काणी आहेत ह्मणून सांगितली. मी०- त्याच्याव-
र अभिषेकाचें पाणी पडलें नसेल शास्त्री०- सर्वां
वर सारखें पडलें होतें मी० तर मग ही गोष्ट आधीं

खोटी. शास्त्री०- शंभर साक्षी आहेत. मी० हजार असले तरीं शास्त्री० असें कसें अुत्तर- हीतुम्ही सांगितलेली गोष्ट मी हि अैकून तेथें गेलों आणि केतुची मूर्ती तपासली त्या त्याचा अंगावर कवच होतें तेंखरवडून काढिलें आणि मग अभिषेक कर्तांच लालभडक झाली शा०- याचें कारण काय मी०- संध्याकाळीं अेका ठकानी कोणाचा न कळत पिवडीची पूड गोंदाचा पाण्यांत कालवून केतूवर लेप करून ठेविला होता. अभिषेकाचें पाणी चुन्याचा मडक्यांत लें होतें तें हळदीवर पडतांच लाल झालें. हें पोरा बाळांस सुध्दां माहीत असतें सिध्दांताला कोठें बाध येत असतो काय शा०- कुदळीचें कसें मी०- ही बातमी मला समजल्यावर मी गेलों कुदळी चा जंग घांसून काढला तो पितळ दृष्टिस पडलें. कुदळी झाली नाहीं हा दोष तुम्ही परिसाला देतां काय? स्वधर्म टाकून पक्षपात करण्याची परिसाला काय गरज. शास्त्री०- आमचा ऋ या स्वरावर रेफ आहे व्यंजनावर नाहीं. याचें अुत्तर अुदा०णे नि अग्निक १ नि अविध्यत् २ निर्अिच्छ ३ नि अुत्तर ४ निअेक ५ निऔषध रामायण ६ नि औषध ७ निअंजन ८ हीं सर्व अुदाहरणें कबूल आहेत काय. जर कबूल असतील तर मग तुमचा जो निऋती तो अम्ही कबूल करूं यांत काय दारवबलें.

विसर्गाचा करांचा रेफ आणि पदांत जो स्वर अस. तो त्याचें व्यंजन न करितां संहितेंत स्वर रूपचं का ठीम रारवाचें हीं सर्व अुदा॰ पहा मान्य करा. शा. स्त्री॰-हें सर्व अषद्वाळ शास्त्र विरुध्द विलग दिसतें. मी॰ आणि तुमचा निर्वृत्ती मात्र विलग नाहींना. शास्त्री॰-हे सर्व संधी सुटे पडतात. मी॰-तुमचा काय जडला आहे कित्येक ठिकाणीं विरोध दारवव. ले तरिं तुमचा हृदयांतला पक्षपात जात नाहीं. ध. न्य असो तुमचें हृदय. अहो अेरवादा दगड देखी. ल कबूल करील. आणि तुह्मी विद्वान् असतां दि. सेना. शास्त्री॰-काय करावें मी॰-पक्षपात सो. डावा. निरभिमान व्हावें न्याय पहावा. सत्या. चा अभिमान धरावा. आतां आमचीं ध्या किं. वा तुमचें सोडा. बाप दारववा नाहींतर श्राद्ध करा. तेव्हां शास्त्री बावा अडले आणि कबूल झाले किं, अशा ठेंचा ठिक ठिकाणीं कां लागतात व त्या कशा अुलगडाव्या. तें सर्व सांगतों याचीव्य. वस्था अशी लावाची सर्वांचा शास्त्रा प्र॰ सं. धीकरांचा ह्म॰ सर्व अुलगडलें. निराग्निक निराविध्यत् निरिच्छ निरुन्तर निरेकं निरोधं निरौषध निरंजन यांच प्रमाणें निर्वृत्ती असें न करितां निरृती असें करा ह्म॰ पक्षपात गेला. आणि न्याय झाला. आतां तुमचा रेफ कोठें.

गेला. व तिचें गुरुत्व कोठें येतें तें पहा. आणखीं एक न्याय दाखवितों आतां ॠ हा जो स्वर आहे त्या विषयीं शास्त्र विचार यांत काय आहे आद्यो हौरे फौत योरेकामात्रा अभितः ह्म० सभोंवार अकाराचें वेष्टन कसें अु०- मोदका प्रमाणें ह्म०-मोदकाचे पोटांत गूळ व नारळ हे २ रकार समजावे व आसमंतात् पिठाचें वेष्टण ह्म०- स्वराचें रर ॠ असें मी० हें सर्व असंगत कसें. यांत दोन व्यंजनें कबूल करणें ह्म०- अर्थात जोड झालें हें तर जोड नाहीं अेक खोटेपणा आला. २ नाहीं तर अेक तथापि व्यंजन ठरलेंच असें असून त्यालास्वर ह्मणणें हें अगदीं अनन्वित आहे. ह्म० दोनबायका करून मी अविवाहित ब्रह्मचारी आहें असें चौघांत बोलणें तद्वत् हें आहे. ॠतंच सत्य या ॠ मध्यें मोदकाचें अुदा० यांत दिसतें तें कसें अैकणाराला किं पहाणाराला हें ठरवणें कांग्रेस भरवल्या शिवाय समजणें कठिण दिसतें बरें माझ्या समजुती प्रमाणें मी १ अुदा० देतों तें कितपत जुळतें व्यंजन ह्म०- सामान्य कंद्याचें अथवा तावडानाचें भिंग ह्म०- त्याला कल्हअी नाहीं ह्मणून त्याला कोणी आरसा ह्मणणार नाहीं. व त्याचे दुसऱ्या बाजूस कल्हअी दिली ह्मणजे त्याचें नांव आरसा. तसें येथें प्रथम

अुच्चारांत रकार येतो त्याला शेवटीं आमचा ९ नंबरचा अृ ह्रा स्वर येतो तेव्हां प्रथम व्यंजन नंतर स्वर ह्म० आरशाचेंच अुदा० मिळतें मोदकाचें मिळत नाहीं अुदा०- विम्बप्रस्न्यस्य या अुच्चारांत श्रवण करणारास विचारावें केसें अैकूं आलें तें सांगा. ह्म०- प्रथम प् नंतर स् पुढें न् पुढें य ह्म०- १ अक्षरांत ४ व्यंजनें व अेकस्वर ह्म०- (प् स् न् य् अ) हीं ४ भिंगें अुभीं केलीं आहेत् यांत शेवटच्या भिंगाला आपले अुजवे बाजूस कल्हअी दिली आहे जशीं अुभी केलीं आहेत् तशींच अैकूं आलीं असेंच ह्मणेल हा अनुभव घेऊन पहा. पण शा०- लोक अनुभवाला मानीत नाहींत ह्मणूनच असे ठिकठिकाणीं निरुत्तर होतात् ठेंचा खातात् मोदकाचें अुदा० मंडळींत पटवा ह्म० समजेल. ृतंच सत्य प्रथम र नंतर अृ हा ९ नं० चा स्वर ह्म० ृ हें रराचे १६ खडींत ९ व्यंजन ठरलें ही झाली अुच्चाराची गोष्ट पण शास्त्री०- अृतंच हा आमचा स्वर आहे. अृ हा लेख तुह्माला मान्य असल्यास आज पर्यंत जो अुच्चार करीत आला त्यांतला रकार टाका ह्म०- आतां यांतल्या चुक्या २ र व्यंजन ह्मटलीं ते खोटें १ चुकी बरें १ व्यंजन आहे हें खरें पण तेंहि नको २ चुक्या मोदक खोटा

झाल्या. मग यांचा शास्त्रांत खरें काय ? १ मात्रा
हें खरें पण त्याची मातबरी काय आमचा पू सू
नू य फून्य हा ४ अक्षरांचा असतां १ चमात्र आ-
हे तर या पुढें याची प्रतिष्ठा ती काय. आणखीं दाख-
वितों आमचें शा० ठिकठिकाणीं खोटें कां पडतें.
असें शा० विचारतात् अुत्तर- आपण विचार नक-
रितां लेखांवर भरवंसा ठेवितां ह्मणून. शास्त्री०-वि-
चार कसा कराचा. अु०-ताळा पहावयाचा .शा-
स्त्री तो कसा पहावा. अु०- आपण जें सूत्र ह्मणतों
तें कोठें जमतें कोठें चुकतें याचा तपास करून प-
हावा. शास्त्री०- तें तर खोटें ठरलें. मी०- अहो खोटें
नाहीं खरें आहे. पण त्याचा अुपयोग कुठें कराचा
हें तुह्माला माहीत नाहीं. वड्याचें तेल वांग्यावर
ओतलेंत् तें सूत्र या अृचें नवे. शास्त्री०- तर म-
गतें कोणाचें अु०- रेफ वाल्या ृ चें ह्म०- अथ-
तेयो निरृ- निरृती अृग्मिणि ृग्मी हे जे ह्रस्व ृ
आहेत त्याचें सूत्र ह्म०- जोडाक्षर वाला ृ तेव्हां
मागें जें गुरुत्व येतें तें योग्य आहे तें येणारच अ-
सेंच पाहिजे. सिद्धांत आहे त्याला बाध कसा
येणार पण तुह्मी अर्थाचे अनर्थ करून नसता
बाध अुत्पन्न करितां याचा दोष कोणावर याची
अुपपत्ती आद्यो द्वौ रेफो ह्म०- अेक डोकीवर देतां
तो. दुसरा खाली अुच्चारतां तो असे २ झाले.

पण आपण या ऱ्‍ कडे न पहातां तो गरीब बिचारा स्वरांतला ॠ त्यावर आरोप केला २ तर कायपण १ र ही त्यांत नाहीं. हाइनाला पळगया शिशीवाले कु पकडा. जर आपण ताळा घेऊन पाहिलें असतें तर सहज समजलें असतें. शास्त्री०- आतां माझी खात्री झाली. तरी मीं आश्चर्य करीत होतों शास्त्र खोटें कसें पडलें. पण नाहीं. आम्ही ढोरेफो हें यानीं कबूल केलें शास्त्र आहे तें खोटें नसलेंच पाहिजे. या ॠ बद्दल नसेल तर त्या ऱ्‍ बद्दल असेल. लांडगा ह्मणतो करडाला तूं नसशील शिव्या दिल्या तर तुझा बापानें दिल्या असतील शास्त्री०- पण आमचें सूत्र तर खोटें नाहींना. अु० सूत्र खोटें २ रेफ नाहींत् १ रकार मात्र आहे. निरृती डोकी वरच्या रेफ खोटा. स्वराचें वेष्टन खोटें. अंती मात्र स्वर आहे ॠ हा. शास्त्र खोट्या प्रतिज्ञेंत येत आहे. प्रथम ज बानींत ॠ याला स्वर ह्मणतें अेक परिभाषा ठरवतों. दूध ह्म०- सडांतून निघालेलें पाणी ह्म०- आकाशांतून पडलेलें चहा ह्म०- दुधाचें व पाण्याचें मिश्रण. ही परिभाषा कां लिहिली. दूध ह्म०- स्वर पाणि ह्म० व्यंजनें तीं सर्व स्वर रहित चहा ह्म० दूध पाणि ह्म०- स्वर सहित व्यंजनें. वेदांत स्वर स्वतः सिद्ध आहेत् ते अक्षर गणनेत आहेत् हें मागें सांगितलें आहे तसेंच

स्वर सहित व्यंजनें ओत प्रोत भरलीं आहेत् तेंच स-र्व काव्य. तसें स्वर रहित व्यंजनें हि आहेत् तीं अ-क्षर संख्येंत नाहींत १ तीं मदत्नीस आहेत् १ हीं झाली वेदाविषयीं. आतां व्यवहारांत काय प्रका-र आहे तो पाहूं. पहिली प्रत अुत्तम. दुसरी मध्यम. ति. कनिष्ठ हें वेदा विषयीं व्यवहारहि तसेंच आहे. ह्मo- वसंत पूजेच्या ब्राह्मणाना पहिलीप्रत दूध दु-सरी प्रत चहा. तिसरी पाणी. तें तर कोणी पाजीत नाहीं. पण दुधाचीं व चहाचीं भांडीं विसळ्याकडे त्याचा अुपयोग करतात् प्रथम जबानींत अृयाला स्वर ह्मटलें तेह्वां अर्थात् दूध ह्मटलें ह्मo- पाणि नाहिं. ह्मo- व्यंजन नाहीं. दुसरी जबानी यांत २ र र व्यंजनें कबूल करतें तेह्वां अर्थात् जोड व्यंजन ठरलें ह्मo- हा स्वर नाहीं ह्मo शेर दुधांत २ शेर पाणी. ह्मo- अेके स्वरांत २ व्यंजनें ह्मo- चहा ठर-ला. तिसरी जबानी. याच्याच डोकीवर रेफ दिला ह्मo- अृ पहिले २ रकार कबूल करून त्यावर रेफ दिल्या कारणानें ३ रकार होतात् ह्मo- र् र् र् अृ हें या जबानींत सिध्द झालें. चवथी जबानी अेक र व अेक स्वर ह्मo- जोड नाहीं. अेकदां स्वर दु. अेकेरी व्यं. ति. दुहेरी व्यं. च. तिहेरी व्यं. याचेंच नांव शास्त्रना साष्टांग नमस्कार असो. शा. आतां माझा अभिमान जिरला हा सर्वस्वी

घोटाळा आहे. यांत संशय नाहीं. आतां खरें कायते-
वढें मला समजून घेण्याची अिच्छा आहे. अैका
निः या पदापुढें कोण चाहि स्वर अुभा केला तर
संहितेला र त्व प्राप्त होतें. ह्म० स्वराचें व्यंजन होतें.
ररारिरी पैकीं होतें अुदा० सित्धांत निः अग्नयः
निरग्न० निः आविध्यत् निरा० - निः अिच्छ नि-
रिच्छ निः अुत्तर निरु० - निः अृती निरृती. या प्र-
माणें सोळाखडी बिनचुक समजावी. अपवाद ना-
हीं. निरृती असा ठरला याचा ताळ्याला पुरावा.
शार्दूळ विक्रीडित छंद त्याचें सूत्र म्सो ज्सौ तो
गादित्य अृषयः याचे गण ६ त्रीक १८ व १ गुरु १९
अक्षरें चरणाचीं त्या पैकीं ३ गणांचीं ९ अक्ष
रें व चवथा सगण येतो. त्याचें लक्षण २ लघु
१ गुरु ह्म० - प्रत्येक चरणाचें दहावें व अकरावें हीं
२ लघु व बारावें दीर्घ या प्रमाणें येतात् अुदा०
मुहूर्त मार्तंड श्लोक सहावा- मेशादस्त्रय माग्निक
द (गिरिशाः) प्रोक्ता अदित्यंगिरः सर्पाः क व्य
भुजोभगोर्य (मरवि) त्वष्टा समीरः क्रमात् । अिंद्र
ग्नीत्वथमित्र अिंद्र (निरृती) नीरंच विश्वेविधि
वैकुंठेवसुपाश्यजेक (चरणा) हिर्बुध्न्यपूषाभि-
धाः ।। १।। यांत काय पहावयाचें दर चरणास
१० वें ११ वें १२ वें यांत दोन ह्रस्व १ दीर्घ असेंच
यावयाचें प्रथम चरणांत गिरिशाः हितो० मरवि

त्वष्टा तृती० निरृती चतु० चरणा हीं होत् तर या निर्ऋतीला जर रेफ ह्मटला तर तो रगण हो तो. ह्म०-मध्य लघु होतो. आणि रेफ न ह्मटला तर सगण होतो. ह्म०- अंत्य गुरु तर हा माझे मता लाताळा देत आहे. तेह्मां अर्थात् हे ग्रंथकार माझ्या वृत्तीची साक्ष देत आहेत्. दुसरें प्रमाण सप्तशतींत- बाणैःसिध्दिर्षिभिः असा ऋवर रेफ आहे यापासून छंदोभंग होतो. अनुष्टुप् छंदाचे कोणत्याहि चरणाचें पंचमाक्षर गुरु नसते तें येथें या रेफामुळें होतें. र्षि हें गुरु झालें रेफ न ह्मटल्यास छंदोभंग होत नाहीं. दुसरें रराचे अथवा ऋाचे सोळा खडींत कोणत्याहि अक्षरावर रेफ येत नाहीं. तो निबंध येथें मोडला. दोन दोष उत्पन्न झाले. नाहींतर आमचें शास्त्र पहा. बाणैरसिधिरृषिभिः निर्दोष झालें. कोणी ह्मणतात्. हे दोन्ही ग्रंथकार चुकले ह्म०- आपण चुकून ग्रंथकारावर घालतात् जसें आपण चुकतात पण ष्टेशनावर गेलों होतों गाडी चुकली असें निःशंकपणें ह्मणतात् ग्रंथकार ह्मणतील एक र व्यंजन व एक स्वर एवढयानें कुठें जोड होत असतें होत नाही. तर त्याचा मागें गुरुत्वाचा संबंध काय तुह्मी लेख चुकतां ह्मणून गुरुत्व येतें. तुमची चुकी आमचावर घालतां काय वाहवा! वाहवा!!

शाबास. निवृत्ती असा लिहावयाचा ह्म०-लेखा-
चा अुच्चाराचा आणि छंदो भंगाचा व निबंध
शास्त्राचा कोणचाहि दोष येत नाहीं. शास्त्री०-
हें तर आगदीं सरळ आहे. न्याययुक्त आहे अ-
सें असतां पुढांत कां पडलें. अु०- किस्या वरील
सात्वे नंबरच्या स्वरांत गुप्त रूपानीं र व्यंजनानीं
प्रवेश केला. तो लेखांत नसतां गफलतीनी अुच्चा-
रांत आला ही महान् महान् चूक झाली. विचार
वंत जन हो मी काय सांगितलें व काय सांगाचें हें
मला अवधान रहात नाहीं या मुळें तोंच तोच
मजकूर पुनः पुनः येतो माफ करा. कलम ४
कृ क्र या शब्दाचा निर्णय आज पर्यंत जें लोक
ह्मणत आले तेंच खरें असें समजत असाल तर
कृ हें जोड आहे असें समजा. हा अेक पक्ष
जोड कबूल करवत नसेल तर अुच्चारांत रकार
आणूं नका. हा दुसरा. दोहोंत दोन नडी आहेत्
प्रथम पक्ष घेणें असल्यास लेखांत जोड नाहीं
या मुळें कृचा मागें गुरुत्व नको. आणि व्यव-
हारहि तसाच चालूं आहे. पण अुच्चारांत रका-
र येतो ही नड येते. कोणी असें ह्मणतात लेखाचें
प्रमाण अह्मी मानीत नाहीं आमचा अुच्चार
खरा आहे तर अुच्चाराचें पृथक् करण करितों.
१ कृ १ र् १ ॠ ह्म० २ व्यंजनें व सातवा स्वर तेव्हां

अर्थात जोड टरला. तेह्वां कृचा मागें गुरुत्व पाहि-
जे तें कोणी ह्मणत नाहींत् हें असंगत होतें. उ-
च्चारा प्रमाणें जर लेख करणें तर कृ असा का
ढिला पाहिजे ह्म० क् र् अृ जो पक्ष घ्याल
त्यांत नड आहे च नसः क्षत्तृभ्यः या प्रमाणें
सकृत् हा कृ छिन्न ह्मटला पाहिजे. सला गुरु
त्व पाहिजे. तसें चालूं नाहीं मग खरें काय. कृ
या लेखांत रकार नाहीं ह्मणून उच्चारांतही आ-
णूं नये. तो जोड नाहीं तेह्वां ककाचे बाराखडींत
७।८ नंबरीं घातलें नाहीं. ही महान् चूक झाली.
चवदाखडी झाली असती. पण ह्मणावी कशी
मास्तरलोक क् व्यंजन मुलानां स्वर रहित ह्म-
णून दाखवतात् तशीं कृ खृ गृ घृ ङृ. कलम ५
अंजन् शब्दाला अञ्जन ह्मणावें असें शा-
स्त्री लोक ह्मणतात् तें खोटें कां पंचम ६ मासे
वजन येतो तो शास्त्रा प्र० व निबंधा प्रमाणें १
मासा वजन असतो तो. कवर्गादि पांची वर्गा
चीं उदा० पहा. तस्मात् ञकार बुध्धी पुरस्कर
ह्मणणें अगदीं खोटें. मग खरें काय. आज पर्यंत
जें सर्व लोक ह्मणत आले तेंच अंजन, अंजीर,
पंचांग वगैरे खरें. दुसरें अंजन शब्दांत ञ च्या
भास सुध्धां नाहीं असें कां! आणि जर जबरद-
स्तीनें आणाल तर ञसकट ६ मासे येतो सहज

ह्मणाल तर मुळींच येत नाहीं. नेसेन तर पाटा-
व्याचें नेसेन नाहीं तर अुघडी बसेन. असें का
होतें ञ हा मुळींच खोटा आहे ह्मणून. मग खरा
पंचांग यांत सूक्ष्म अेकच मासा ह्मo त्याचा पुं
ढें ङ आहे तसा या ङ ची व्याख्या मागें दुसऱ्या
कलमात झाली आहे असें वाटतें. तर मग हा खो-
टा ञ आहे तरी कोण. याची अुत्पत्ती कशी झा
ली. य र ल व श जे ५ यांतला प्रथमचा ह्मo
य हा नाकांत ह्मटला असतां ञ होतो अशीं ब-
त्तीस अक्षरें नाकांत ह्मटल्यानीं दुबार होतील.
अुदाo दूंव, कांकडी, वगैरे सूज्ञ याचा विचा-
र करतील. कलम ६ वें- तत् सवितुः तत् षोळशि-
नः या दोन पदांचा संधी कसा हें व्याकरण शा-
स्त्रांत सांगितलें नाहीं संधि न करितां पदरूप सं-
हिता ह्मणण्याचा पाठ आहे. त्यांत अृग्वेदीवै-
दीक परंपरा चालत आलेला सकार पुढें आ-
ला असतां त्स असा संधि करतात् पण ष पुढें
आला असतां त्याचा मात्र करीत नाहींत् पण
तैलंग लोक स व ष या दोहोंच्याहि करीत ना-
हींत. माझें मत असें आहे कीं, ज्या प्रमाणें तत्
शंयोः याचा संधि तच्छंयोः असा करितात्
तसाच संधि याच प्रमाणानीं दोन्ही ठिकाणीं
करावा. ह्मo तत् सवितु याचा तछ्‌वितुः असा

करावा. आणि तत् षो० याचा तच्छोळशिनः असा करावा. ह्म० याची संहिता संधी रूपकरून ह्मणावी पक्षपात करूं नये. स पुढें आला असतां कसा ह्मणावा. याची अु० सांगतों. आमचे चवर्ग ३ आहेत त्यापैकीं तिघांचे द्वितीय येथें घेणें आहेत्. तत् या पुढें जेह्वां श येतो त्यावेळेस च वर्गाचा द्वितीय ह्म० छ हा होतो तच्छ्रेयो तत् जेह्वां स येतो तेह्वां प्राकृत जो च वर्ग त्याचा द्वितीय ह्म० छ होतो. गृत्समद वत्स कुत्स अित्यादि. द्वितीय तसेंच तत् या पुढें षो आला असतां महा प्राकृत जो च वर्ग त्याचा द्वितीय ह्म० छो हा ह्मणावा अु० तच्छो. शिनः षो. ळशित्वं अुच्चार लिहून दाखवतां येत नाहीं. मी प्रत्यक्ष भेटेन तेह्वां सांगेन. अथवा आपण अु० वरून विचार केला असतां आपणासही कळेल. शषस यांत जसे ३ भेद आहेत् तालव्य मूर्धा दंती, तसेंच चवर्गाचे ३ भेद आहेत् संस्कृत च व महाप्राकृत च व प्राकृत च संस्कृत तालव्य, महाप्राकृत मूर्धा, प्राकृत दंती. असे आहेत्. जह्मास तसें या न्यायानीं तालव्यास तालव्य. मूर्धास मूर्धा. तसें दंतीस दंती. हें न्याय सिद्ध आहे. तस्मात् याचा संधि विचार व्याकरणांत अवश्य पाहिजे होता. वेदांत प्रसंग

आहे ह्मणून कलम ७ ज्ञ हें काय आहे वच-
स्येकं मनस्येकं लेखस्यतिस्रं अशी अव्यव-
स्था झाली आहे अुच्चार करतात् द् न् य ध्य
व मानतात् ज ञ ह्मे० ज्ञ आणि लिहितात तें
या दोहोंहून तिसरें ज्ञ ह्मे० कशास कांहींच ता-
ळा नाहीं. जमीन अस्मान् फेर या ज्ञ कडे पहा.
द न य या तिहिं पैकीं अेक तरीं काय आहे.
बरें ज ञ या दोहों मिळून झालें असें ह्मण-
तात् तर या अुच्चारांत यांतील १ हि येत नाहीं.
तेव्हां हा लेख खोटा आहे. यांत ज अक्षर मात्र
दिसत आहे पण ञ कुठें आहे मग प्रत्यक्ष
ज्ञ हीं दोन्हीं अक्षरें दिसता आहेत असें लि-
हिण्याला काय अडचण होती. दुसरें असें को-
ट्यावधी जोड अक्षरें आहेत् प्रत्येकाचें सूत्र
कोटच्या ग्रंथांत लिहिलें आहे तें तर दिसत ना-
हीं. मग याचाच कांरनां खोटें सूत्र करण्याची
गरज काय लागली. ज ञो ज्ञः या पेक्षां आमचें
बरें जञो ज्ञः तसेंच कष योगेक्षः हें अेक
सूत्र ह्मणतात पण त्याचेंच भावंड धाकटें का-
य क्ष या अक्षरांत दोहों पैकीं दिसतें आहे क्ष
अथवा क्ष असें कां लिहिलें नाहिं सूत्राची का-
य गरज होती. दुसरें मी शंका घेतों खस यो-
गे ख्षः असें कां नाहीं शंका कां आली द्रख्ष हा-

ह्रूं यात्मरुख असेंस्रतात असें अेका सिंधूत अढळलें स्मायाचा रुख आणि कांटे झाड र खड्डेंग अख शब्दाला आंख असें कोणी म्ह णतात (लख लाख) कुर्षी काख) खार खार) लक्षुण ह्म० रामचंद्राचे बंधु लक्ष्मण) क्षत्रिय खत्रि) क्षीर खीर) अित्यादि असीं अढळतें यावरून असें वाटतें खष योगें क्षः यांत वादाला जागा राहिली अशीं हीं दोन्हीं अुदाहरणें वादग्रस्त ताळाहीन अशीं घेण्या पेक्षां निर्विबाट विष्ठ फ्न्यस्य अथवा दुःष्वप्न अशीं घेतलीं असतीं तर विद्यार्थ्याची समजूत लवकर पडली असती असो या सूत्रावरून अह्माला काय अुपदेश करणार शास्त्राला कुठें ताळा असतो का हें खरें करून दाखवणार कसें क आणि ष हे दोन अेका जागीं जोडले असतां तिसरेंच होतें कोणचें फ्न्य हें अह्माला खरें नाहीं वाटत. शास्त्री पंडित सर्व मानतात तरतें तुह्माला कां खरें वाटू नाहीं. त्याला प्रमाण सूत्र आहे. करोःप्न्यः हे सूत्र दाखवलें ह्म० लेख माननारे आहेत ते माना डोलवतील असो हा सर्व खोटा बाजार पाहून तैलंग लोकांनीं तिसरीच टूब काढिली. ती अशी ग अ हे दोन धरून त्यांत १ पदरूचा घातला तेव्हां हातचे आले तीन ते कोणचे ग ङ य

मग यग्ञ्येन यग्ञ्य मयजंत देवाः ञ- ञ बदल ङ-
घातला असें कां तर खोट्या बाजारांत खरें काय अ-
संपणार तस्मात् हें महाखोटें. मग खरें काय तर
प्रथम अर्धाज् आणि पुढें जो परमेश्वराचा घर-
चा चवर्गाचा पंचम ञ- संस्कृत प्राकृत महाप्रा-
कृत असे आचे ३ प्रकारचे उच्चार करतां येतील
तो लावावा. ञ ज्ञ असा लेख लिहावा. पण उ-
च्चार लिहितां येत नाहीं प्रत्यक्ष करून दाखवीन
तेव्हां तूं कोठचा कालेजांत शिकलास प्रोफेसर को-
ण होते. प्रोफेसर परमेश्वर कालेज वैकुंठ अशिष्टन
त्यानीं पाठवलेला साक्षीदार त्या पासून विस्तार
फार झाला. मला थोडक्यांत लिहितां येत नाहीं मी
भिक्षुक आहें मी लेखक नाहीं. ग्रंथकार नाहीं
तेव्हां मी जर न लिहीन तर परमेश्वरानीं सांगितले
ला मजकुर जगाला समजावा कसा. तूं भिक्षुक
का आहेस आह्मी समजत होतों कोणी बी. ए.
ए. ले. ल. बी. असेल पण नावां पुढें किताब अस
तो, तो कोठें अढळला नाहीं. तो कसा लिहाचा.
जा परिक्षा पास असतील त्या लिहाव्या. पांडु-
रंग जनार्दन पाध्ये अृग्वेद दशग्रंथ संहिता १
ब्राह्मण २ आरण्यक ३ शिक्षा ४ आश्वलायन
श्रौतसूत्र व गृह्यसूत्र ५ अष्टाध्यायी ६ नैघंटु
७ नैरुक्त ८ छंद ९ वेदांग ज्योतिष १० सर्वानुक्रम

संहितेची पदें ११ त्याचाक्रम १२ त्याचीजटा १३ त्याचा घन १४ या परिक्षा बडोद्यांत पास. अेकदां असें झालें कितीक जणानी सांगितलें हा ग्रंथ लिहूं नका. छापूं नका. कांतर यांत विद्वानांची निंदा होते. व आपले जुने ग्रंथ व जुनीं मतें यांचें खंडन होतें. तेव्हां हें पाप होतें. आणि झांकलीमूठ अुघडी होते शास्त्री लोकांचा रोष होतो तेव्हां हें जगविरुध्ध आहे ह्मणून तुह्माला कोणी बरें ह्मणत नाहीं. आणि वेदांतस्थागोष्टी बोलतां यामुळें भिक्षुकानां तें अवडत नाहीं ते तुमची निंदा करितात् तेव्हां हें तुह्मी करूं नका. सोडून द्या. त्या वेळेस वैराग्य उत्पन्न झालें मनाची चल बिचल झाली आणि सोडून देण्याचा विचार केला. तों कांहीं दिवसांनीं स्वभ्नांत १ ग्रहस्थ येअून ह्मणाले कीं तुमचा हातून हें करवावें अशी परमेश्वराची अिच्छा आहे हा पूर्व संकेत आहे. तुह्मी स्पष्ट वक्ते अहां ह्मणून तुह्माला पुढें केलें आहे बरं तुह्मी नकेलंत तर दुसऱ्या कडुन करवील पण असा निरभीड छातीवाला कोणी हें कराचा नाहीं. तर तुह्मी कोणाचा शब्दाला भिअूं नका. लोक कसे आहेत् आपण कराचें नाहींत् दुसऱ्याला हजार विघ्नें आणितील तर हें सोडूंनका. शेवटास न्या. असें बोलता-

तू तों जागा झालों तेथें कोणी नाहीं पुनः अुत्ते-
जन आलें आणि चालू केलें. कांहीं दिवसांनी
जागेपणी कांहीं ओळखीची मंडळीजमून आली
आणि अुपदेश करूं लागली हें अती पाप आहे
हें टाका सोडून द्या. पुनः मन चलबिचल करूं
लागतें तों पुनः स्वप्नांत ते अनोळे गृहस्थ पण
पूर्विंचेच भेटले. आणि ह्मणाले मी सांगित
लेलें त्याचें काय केलेंत् मी०. लोक फार निषेध
करतात् गृ०- ते तसे करतील पण तूं कोणाचें मा-
नूं नको. ते असत्याचे भोक्ते असतात् ते सत्या-
वर माती टाकणार त्यांकडे तूं मुळींच लक्ष देअूं
नको तुला सोपलेलें कर्तव्य तूं कर. तुझ्याच हतू-
न झालें पाहिजे तूं ह्मणजे कोण समजलास का
अनुवादक. करूंता वेधळाच आहे असें ह्मण-
ण्याबरोबर मी चरकलों आणि घाम सुटला. हें
पाहून गृ०- तूं घाबरलास कां अनुवादक ह्मणतां
तर त्याला पाप फार असतें असें लोक बोलतात्.
तर आपण दुसरा करा. मी नाहीं होत. गृ०- अरे
नाहीं कां ह्मणतोस दक्षणा मिळेल. मगतर मला
चौपट पाप. अरे पाप नाहीं मी आतां तुझी सम
जूत करतों. तूं वर्षश्राद्धाला बसतोसकीं नाहीं.
नाहीं कां पाप आहे ह्मणून. गृ०. अिष्ट पंगतीस
कधींतरिं अभिश्रवणाचा निमित्यानीं कां होअ-

ना अन्न खाण्यांत आलें असेल. अथवा प्रसंग येणार तेव्हां तेंच अन्न खावें लागणार आणि भोजन दक्षिणा १ दिडकी देखील मिळाली नसेल आणि पाप. त्यापेक्षां ५।१०।२५।५० रुपये पदरांत बांधले तो बरा. अन्नतर दोघानीं खाल्लें रु० तो खाऊन गेला. तूं नाहीं ह्मणशील तर दुसरा दक्षिणा खाऊन जाईल तूं आजपर्यंत पुष्कळ काम केलेंस. अशा वेळेस हात पुढें करणार दुसरा. आतां तूं पापाबद्दल ह्मणतोस तर यांत पाप मुळींच नाहीं. अज्ञान कुंडांत गचांगळ्या खाणाराला जर कोणी हात देऊन बाहेर काढिल्यास पाप लागेल किं पुण्य तूंच उत्तर सांग. मी उगीच बसलों. गृ०- हें कशा करितां चालवलें आहे. हें तुला उलगडून सांगतों. पूर्वीचीः कथा अशी आहे. एकासिद्ध पुरुषानीं रेड्या कडून वेद बोलवले हें सर्वत्रांस ऐकून माहीत आहे ह्म० पुराण प्रसिद्ध तर ही गोष्ट शेंकडों लोक खोटी ह्मणताहेत. त्याला काळ बराच झाला तेव्हां इश्वराचे मनांत या लोकांची घमेंड उतरावी ह्मणून व इतर जनांस चमत्कार ह्मणून उदाहरणानीं खरें करून दाखवावें. तें कसें तो वेद बोलणारा रेडा कोण तूं मी कसा. तर मग तूं कोण मी माणूस. जर माणूस ह्मणतोस तर माझा

प्रश्नाचें अुत्तर दे. व्याकरण शास्त्र न्याय मीमांसा तर्क ज्योतिष वैद्य शास्त्र काव्य नाटकें अमरकोश रूपावळी समास चक्र वगैरे अणखी पंधरा नांवें घेतलीं यांतून तूं काय अध्ययन केलें आहेस कांहीं नाहीं. अरे मग रेड्याला आणि तुला काय फेर आहे कदाचित् तूं समजशील मी वेदाध्ययन केलें आहे. तरतें रेड्यानींही ह्मणून दाखवलें तर त्याच्याहून तुझी विद्या ज्यास्त काय कांहीं नाहीं तर मग सांगतों तोच रेडा तूं हूं वेद ह्मटला असें समजत असलास तर ती चूक आहे. त्यांनीं तुझ्या कडून ह्मणवला कसें. लक्ष्मणानीं अुपोषणें केलीं नाहींत तर रामचंद्रानीं घातलीं कां त्या पासून पुढें कार्य करून घेणें होतें ह्मणून. तसें पूर्वींचा रेडा त्याच्या गळ्यांत पुष्पमाळा वगैरे सजवून पालखींत घालून मिरवावा. असें कित्येक ह्मणूं लागले. कित्येकांनीं निषेध केला. त्याचें महत्व यांत कांहीं नाहीं त्या सिद्ध पुरुषाचें महत्व आहे. त्याला मिरवा असें घडलें. गृहस्थ ह्मणतात् जर शास्त्री पंडितांचा शतांशाचें अध्ययन ज्याचें नाहीं त्याच्याच्याने त्यांच्या पुढें १ ब्र तरि काढण्यास सामर्थ्य येअिल काय. असें असतां हा अुपद्व्याप कशाला. तर शेंकडों वर्षांत वेदांत लोकानीं अज्ञान

पणानीं नाना तऱ्हेचे अुच्चारांत लेखांत समजुतीं-
त मात्रा विषयांत कित्येक अन्याय केले आहेत.
त्या मुळें यथासांग न होतां व्यंग मात्र होतें. अव-
क्षर हनायुष्य विस्वरं व्याधि पीडितं असे अने-
क दोष घडता आहेत. तर लोकानां चांगला मार्ग
दाखवावा. या प्रमाणेंच शास्त्रांत फार घोंटाळा
झाला आहे. त्या मुळें अर्थाचे अनर्थ झाले
आहेत् प्राती शास्त्र्याचे अर्थ भलते सलते होत
आहेत् तेह्वां हें सर्व जगाला सत्य काय असत्य
काय न्याय काय अन्याय काय वगैरे कांहीं
गोष्टी तुझा द्वारानें जगांत प्रसित्ध कराचा आ-
हेत् तर कोणी निंदा करितील तिचें तुला पाप नाहीं
व कदाचित् कोणी स्तुतीहि करील तीही तुझी
मानुं नको. यांत तुझा कडे कांहीं नाहीं. तूं फक्त
अनुवादक. तुला रेडा म्हटलें त्याचें वाईट वाटूं
देअूं नको. जो वेद बोलला तोच रेडा तूं तो तु-
झा पहिला संस्कार आतां दुसरा संस्कार करा-
चा तेह्वां तुझीं शिंगें मोडुन टांकली व शेंपूटहि
उपटून काढिलें आणि माणूस केला. पूर्व जन्मां-
त् वेदोच्चाराचा पुण्या मुळें सप्त जन्म भवे द्विप्रो
यांत जन्म दिला. असें हें पूर्व वृत्त आहे. याक-
रितां हें झालेंच पाहिजे. अूठ अुद्योगाला
लाग. मी० हें आपणास कसें समजलें ग...

अह्माला सर्व समजतें मी॰ आपण कोण अेवढें विचारतांच जागृती आली. पुष्कळ बोलणी झालीं कित्येक स्मरत नाहींत् कांहीं अठवलीं विस्तार फार झाला. विषयांतर झालें माफ करा. त्या वेळेस पायां पडण्याचें अठवलें नाहीं मग वाटाला लागलें इष्ट.त झाला असें जे लोक बोलतात् तो हाच असावा. परमेश्वर ओळख देत नाहीं रूपांतरा नीं भेटतो कलम ८ वें संज्ञा यांतील अनुस्वारा बदल विचार. सं या अनुस्वारापुढें प्रथम दकार येतो. तर त्या दकाराचा पंचम न् हा अुच्चारांत १ मग या पाहिजे छंद बंद तो नकार यांत येत नाहीं ही १ चुकी बरें शास्त्र ह्मणतें द कार नाहीं जक आहे. तो जरिं धरिला तरिं त्याचा पंचम ञ् हा मध्यें आला पाहिजे तोहि संज्ञा या शब्दांत येत नाहीं तस्मात् हेंहि खोटें तर मग यांत येतें तरी कोण वँ ह्म॰ वला अनुनासिक अुच्चार करावा ह्म॰ सिंह यांत जो वँकार येतो तो त्याची प्राप्ती येथें येते का तर नाहीं मग त्याची तरिं प्राप्ति कोटें कोटें येते. श स ष र ह अ व अेवढीं ७ अक्षरें अनुस्वारापुढें आलीं असतां वँ होतो. तर येथे निबंधा प्रमाणें वर ७ सांगितले ले यांतून कोणीही नसता दकार व जकार घरला तरिं वँ येणें नाहीं असें असताना संज्ञा हें

आज पर्यंत निराधार शास्त्री पंडित यांचे हातून कसें चालले आहे. याला आधार काय असें विचारलें तर ब्रह्मास्त्रा खेरीज दुसरा अधार मिळणें शक्य नाहीं. ब्रह्मास्त्र तें कोणचें. जावर कोणाचें ही शस्त्र चालत नाहीं तें. असें कोणचें तें सांगतों पण पूर्वीं पाशुपतास्त्र सोडुनजर काम झालें तर बरेंच झालें ह्मणाचें त्यानीं काम न होओील तर पुढें हा प्रयोग करा चा. पाशुपतास्त्र कोणतें शास्त्राद्बुद्धिर्बलीयसी यानीं दुनिया झुकतें पण माझावर तें चालत नाहीं मला वरप्रदान आहे पण अेके ठिकाणीं शाप झाला आहे. ब्रह्मास्त्रा पुढें तुझें शस्त्र कांहीं चालाचें नाहीं. अु: शाप खालीं मान घातलीस तरतें झोंबणार नाहीं विटून जाअिल. अथ ब्रह्मास्त्रं काहो आज परयंत जे कोणी शेंकडों विद्वान् मोठमोठाले गांवोगांवीं होअून गेले त्यांसका कांहींच कळत नवतें तेका सर्व मूरख होते. या ब्रह्मास्त्राचा पराजय त्रैलोक्यांत कधींही होणें शक्य नाहीं. मगते शांत होतात आणि आनंद पावतात् यांत २ विषय झाले. आठवा, नववा याच्या विचार सूज्ञ करितील.

कलम १०- अॄ आणि ॡ यांचें क्षेत्र फळ अेक. तें कसें जें ॠ याला खालीं निशाणी स्वराची करितात तो १६ स्वरा पैकीं ९ नंबरचा होय तीच

निशाणी ृ या व्यंजनाला व तीच ॢया व्यंजनाला मग १ च स्वर दोहों मध्यें आहे हे स्वर दोन वेगळे असें ठरत नाहीं ९ नं० स्वर ऋ हा र ला लावला ह्म० ृतंत्वा हा अुच्चार आणि ल ला लावला ह्म० ऌ याचा अुच्चार क्ऌप्ति शब्द ककार टाकावा ह्मणजे जें खालीं अुरलें तें ऌ असें ह्मणावें तेव्हां दोहोंचें क्षेत्रफळ अेकच तें हें याची विचक्षणा मागें पुष्कळ झाली आहे ऋ याचा अुच्चार अ या स्वरा प्रमाणें ृ याचा र व्यंजना प्रमाणें ऌ याचा ल व्यंजना प्रमाणें पृथ्वी बृहस्पती मृडय हीं ३ प्रथमाक्षरें याना तोच स्वर आहे तीच निशाणी खालीं केलेली आहे. पण अुच्चारांत इकार येतो तो आणतां कामास नाहीं जर अुच्चार अळणी वाटत असेल तर तीं अक्षरें प्रृथ्वी ब्रृहस्पती म्रृडय अशीं काढावीं. आणि जोड मानावीं आणि त्याचे पाठिमागें गुरुत्व देत जावें. कां जोड होतात ह्मणून सारांश लेखांत जोड नाहींत व मनांतही जोड नाहींत पण अुच्चार मात्र जोडाचा करितात. मनस्येकं वचस्येकं हें न्याययुक्त नवे सूज्ञ याचा विचार करितील.

कलम ११ वें. क्ऌप्ति याचा विचार पुष्कळ झाला सारांश हा जोड आहे क् ल् हीं २ व्यंजनें ॠ हा ९ नं स्वर तेव्हां अर्थात जोड झालें तरहे ककाचे

सोळा खंडांत जमेस धरणें हा महान् अन्याय होत आहे ताळा नाहीं असें अु॰ दाखवतों. द आणि व हीं २ व्यंजनें मिळून द्व तसेंच क ल मिळून क्ल हें जोडतें जोड समसमान झालें तर द्व ला खालीं ९ नंबरची निशाणी करतों. तशीच क्ल याला हि करितों यद्वत्‌ सक्लृप्त या दोन्हीं अुदाहरणांत मध्यमाक्षरें पहा. जोड अक्षरास ९ नंबर साम्य आहे प्रथमाक्षर दोघांचें लघु आहे पुढें जोड आल्या कारणानें त्यास गुरुत्व प्राप्त होतें हा न्याय सिद्धांत आहे पण प्रथम शब्दाच्या य त्याला गुरुत्व मिळतें यद्वत्‌ नियह्मणाक्षि तसें दुसऱ्या शब्दाच्या जो स याला कां मिळूं नये. ब्रह्मणाहि सक्लृप्त हा पक्षपातांत् कां असावा हा अन्याय नवे काय अेक दाखवला दुसराही चूक दाखवलीहि गुरुत्वा विषयीं खरेंच पडली असें कोणी ह्मणतील ही हलकी बाब आहे अुः तर आतां अुच्चारांत पक्षपात् दाखवतों पहिल्या शब्दाला द्व याला द्वकार ह्मणतात तसा क्ल याला ट्कार ह्मणत नाहींत् असा अन्याय होतो. शास्त्री॰ ह्म॰- अुद्यां पासून ह्मणूं का. अहो नको कां तोहि अन्यायच होणार तर मग पहिल्यांतला लेखांत नाहीं ह्मणून टाका. आळणी वाटत असेल तर यद्वत्‌ असें लिहा. मग ह्मणा. जों पर्यंत असा लेख लिहीत नाहींत तों पर्यंत ह्मणूं नका. तात्पर्य दुसऱ्या सारखा

पहिला ह्मणा ह्म० पक्षपात गेला. सक्रुस यासला गुरुत्व ह्मणा. क्रु हें जोड ठरलें आज पर्यंत कचा पंगतीस भोजन केल्याचें प्रायश्चित्त देऊन क्रुनी आपल्या पंगतींत घेऊन ९ नंबरांत बसवून सर्वदे- खत भेजवानी दिली पंगतीची शोभा पहाण्या करि- तां पुष्कळ मंडळी बलावली होती ती पंगत कशीहोती क्रु क्रु क्रु क्रा क्रि क्री क्रु क्रू क्रृ क्रॄ क्रे क्रै क्रो क्रौ क्रं क्रः ९ नंबराचे बुडाशीं आहे त्याजकडे पहा आणि हा याच घराण्यांतला आहे अशी खातरी झाल्यास त्याचे मागें गुरुत्व ह्मणा आणि काय. कलम १२ वें- रु हें जोड नाहीं पण अुच्चार जोडाचा होतो त्यांतला रकार टाकावा. ह्म० जोडत्व गेलें मग ककाचे बाराख- डींत ह्म० सोळाखडींत ९ नंबरीं योग्य आहे रकारा विषयीं सप्तशतींत १ अल्प असा पुरावा आहे. भृ- शुंडीपरिघा युधा कांहीं पुस्तकांवर भुशुंडी असें अढळतें तर याचें कारण जो भृ आमचे मतानें या अक्षरांत रकार नाहीं तेव्हां हा अुच्चार अैक- णाराच्या कानांत भु असा पडला कां त्यांत रकार नाहीं यांत रकार नाहीं अुच्चारांत थोडक्या भेदामु- ळें साम्य आलें त्याचा जें कानांत पडलें तें त्यानीं लिहिलें भुशुंडी तो पुढें पाठ ठरला. कांहीं काळा पूर्वीं या भृ ला रकार ह्मणत नसत ह्म० शास्तर लोक स्वर रहित व्यंजन ह्मणून दाखिवतात तसें.

रकारांशाचा आरोप गेला. तेव्हां साम्य आलें लेखा मध्यें रकार नाहीं. भृ भू अृ भू अु भु दुसरें प्रमाण. कृष्ण शब्दाला परदेशी अूर्फ (पुरभय्ये) हे किसन ह्मणतात. तें कां कृ अृ कृ कू अि कि यात्सर्यरकार पूर्वीं नवता तिसरें प्रमाण. सिंधूतील वाक्य तेला धार वांकुडी तुपा धार अुजु हें वाक्य येथें कां सांगितलें हा अुजु शब्द आहे हा संस्कृताचा अपभ्रंश आहे तो असा अृजु ह्म० सरळ. तेलाची वांकडी तुपाची अृजु त्याचें अुच्चारांत रकार नवता यामुळें अैकणाराच्या कानांत अुजु असें पडलें स्वरांत १ नंब० रकार टाका ह्म० सर्व नीट आहे. कलम १३ वें. प्राकृत च वर्गाची वेदांत गरज आहे ती कोठें तत् या पुढें स प्राप्त झाला असतां जो टाका अु वर्ग त्याचें द्वितीयाक्षर त्सरुः त्सारी हें नाक मुठींत धरून पायां पडून घेणें भाग पडतें मग त्याला प्राकृत ह्मणणें ह्म० त्याचा अपमान करणें असें होतें. हा अन्याय होतो. गृत्समद मत्सर कुत्स वत्स यांतील द्वितीयाक्षरें पण द्वित्त हें कसें जसें तत् या पुढें शं आलें असतां तच्छं-यो० ह्म० संस्कृत चवर्गाचा द्वितीय होतो तसें तर या दोन वर्गाचा अु० वरून तिसरा जो महाप्राकृत त्याचा न्याय करणें तें कसें तत् या पुढें ष प्राप्त झा० महाप्राकृत जो० चवर्ग त्याचा द्वितीय द्वित्त

अर्थात न्यायानीं झालाच पाहिजे. शास्त्री० अु०
कोठें आहे अहो हें घ्या तत् षोळशिनः तत् षट्
लेख तच्छोळशिनः षोळशिखं अेवतच्छ ड्ढिघं
षळंग विकःरोति हीं अु० न सांपडतीं तर मारखा-
ण्याची पाळी आली असती. असो जाला प्राकृत
ह्मणतां तो च सामवेदांत आहे त्यांत तुमच्या संस्कृत
वर्गापैकीं अेकही अक्षर नाहीं. तेव्हां असा न्याय
निष्पन्न होतो कीं, जाला महा प्राकृत ह्मणतां ह्म-
तिही वेदांत त्याज्य मानतां तो पंचाक्षरी वर्ग अ-
थर्वण वेदांत त्याचें ग्रहण असलेंच पाहिजे. जर
वेदांत नसेल तर जगांत आलें कोठून आणि तुम्ही
घरांत शिरूं दिलेंत कसें. प्राकृत महा प्रा० या दोहीं-
चीं द्वितीयाक्षरें ऋग्वेदांत आहेत आणि० प्राकृता-
चीं मगळीच सामवेदांत आहेत असें जर
आहे तर त्याचा विचार शास्त्रांत अवश्य पाहिजे
कां नको कर अुदा० दिली ती लोकांच्या ओळखी
करितां तशी लिहिली नाहींतर तच्छविंदुः ग्रह
मद कुच्छ वच्छ चार द्वित्त आहेत पण ष
दुः घारी हीं "आपैकीं च आहेत. द्वित्त नाहीं
तहो विचारवंत जन हो निःपक्षपातानें याचा
विचार करा. कलम २५ मात्रांचा विचार परिभाषा
ह्रस्व अक्षर अेक मात्र दीर्घ अक्षर द्विमात्र सोळा
स्वरांपैकीं पहिले १० त्यांत विसर्गाक्षरें १ मात्र ५ बाकी

११ द्विमात्र या प्रमाणें सर्व व्यंजनें सुध्धां समजा
वीं ऱ्हस्वाक्षरा पुढें जोड आलें असतां प्रथमचें
ऱ्हस्व असतां द्विमात्र होतें उ० ऱ्हस्व या शब्दाचें प्र-
थमाक्षर ह्म० ऱ्हहें अेकमात्र असतां पुढचें स्व-
हें जोड आलें ह्मणून मागचा जो ऱ्ह् झाला द्वि-
मात्रत्व आलें तेह्वां पहिल्याच्या दुप्पट झालें. या
प्रमाणेंच दीर्घ शब्दाचें प्रथमाक्षर दी हें द्विमात्र
असतां त्याच्या पुढें र्घ अक्षर आलें तें आहे जो-
ड तेह्वां प्रथमची जी दी द्विमात्र होती ती चतुर्मा-
त्र झाली ह्म०-होती त्यापेक्षां दुप्पट झाली. या-
ला प्रमाण अनुभवसिध्ध शा० ह्म०- हें अ-
नुभव प्रमाण अह्मी मानीत नाहीं लेखी प्रमा-
ण मानतों शास्त्र चाला ३ मात्रा ह्मणतें ह्मणा
भांडण करून काय होणार. जा दिवशीं सत्य
जाणणारा न्यायाधीश भेटेल त्या दिवशीं पुढें
अरूज माडूं. आणि मग त्रिमात्रा कोठें आहेत तें पाहूं
मात्रा ह्म० काय हें कित्येक मोठे ह्मणणारे वि-
द्वानांस सुध्धां माहीत नाहीं. अेक विद्वान अ-
सें तीन अक्षरांचे जोड हे त्रिमात्र झालेच
पाहिजे हा सिध्धांत ठासून बोलले मी०- ३
तर काय पण ४ अक्षरांचें जरी जोड झालें त-
रीतें अेकच मात्र उदा०- अेक तोळ्यांत लवंगा
आणि वेलदोडे जोखले तरी ते अेकच तोळा. लवंगा-

वेलदोडे आणि जायफळ असे ३ जिन्नस तोलले तरि ते १ च तोळा. आणि लवंगा वेलदोडे जायफळ जायपत्री या ४ जिन्नसा आहेत तथापि अेकच तोळा हें अु० शास्त्री बावांस पटलें नाहीं तेह्वां माझे जवळ मात्रा जोखण्याचा कांटा आहे त्यांतून सुध्दां जोखून दाखवल्या तेह्वां मती खुंटली आतां तरीं अुगाच बसावें पण अिंगा कोण. अेकजण कुस्ती खेळताना हारला, चित् झाला. पण अिंगा कोण तो ह्मणतो पडलों खरा पण नाक कोणाचें वर (अुताणा पडला त्याचें) ते ह्मणतात् हारेलवेचा कांटा अशास्त्र आहे. दोहीं बाजूंस राम समान नाहीं यांत जोखलेलें बरोबर कशाव रून्यांत पासंग असलाच पाहिजे. मी० चांगला ज्ञाता गवयी असेल तर आणा. मग पासंग पाहतां येअील. तेथें १ मर्मज्ञ गृहस्थ होते त्यांना माझें भाषण रुचलें ते ह्मणाले जरा थांबा मी गवयी घेअून येतों ते घेअून आले. गवयी बोलतात् मी पुष्कळ सज धान्यांतून हिंडलों आहें. पण अद्यापि मात्रा जोखण्याचा कांटा पाहिला तर नाहींच पण अेकिलाहि नाहीं ही बात नी मला लागतांच कोणी तरीं धशोटखां सारखा मोठा गवयी आला असावा ह्मणून मी धांवत धांवत आलों मला विचारतात तुह्मी कोण मी ह्मणालों मी

लाडुखवा आहे गवयी० बरें खा ला खा. मिळा-
ला अमचा अभ्यास कांहीं फार चुकला नाहीं.
मला आधीं कांटा दाखवा. तेव्हां मी वेद परिभाषा
समजाऊन सांगितली. तेव्हां ते ह्मणाले खरेंच
लाडु खवा दिसतां जें खरें होतें तें आपयांस
सांगितलें आता शंका कां गवयाच्या आणि तु-
मच्या संबंध काय असें ह्मणाले मी० वेदांत ताल
आहे सूर आहे सारिगमपधनी हें वेदांतूनच आ-
पणा जवळ गेलें आहे. तेव्हां तुमच्या आमचा
संबंध आहे. गवयी०- कांटा दाखवा. तेव्हां मी
पांघरुणातून हात बाहेर काढले. गवयी० ह्यांत
तर कांहीं नाहीं कांटा कुठें आहे. तेव्हां मी टाळ्या
चा अभ्यास प्रारंभ केला. जो कसा वेद ह्मणतात
त्या पध्दतीनें प्रत्येक अक्षरास १ टाळी. ह्या
अभ्यासानंतर ही पहा अक्षरें पुनः पुनः ह्म-
णत असतां दर अक्षरास टाळी. गवयी बोवा
कडून सारखा ताल चालवला व अक्षरें ह्मण-
णें तें मी चालवलें पा या प्रथमाक्षराबरोबर
दादा मामा काका बाबा नाना आणा ह्मणत अ-
सतां ओंक अक्षरा आड टाळी बसली तेव्हां ६
अक्षरात १२ टाळी मेली ही सर्व हिसाब आ-
हेत तेव्हांती प्रथमची चतुर्मात्र टळीं त्रिमात्र
आहेत हें १ प्रमाण. दुसरें तोच प्रथमच्या ताल

चालत असतां मु यरस तु जभन गु सदचलु प्रथम टाळी बरोबर मु पासून प्रारंभ केला तो दुसरी टाळी तु वर पडली तिसरी गु वर पडली व चवथी लु वर पडली हीं अक्षरें जर १ मात्र आहेत् तर चवथ्या अक्षरावर टाळी पडते तर तीं अर्थात चतुर्मात्र निःसंशय असलीं पाहिजेत् ह्म० प्रथमच्यांत हीं चार ह्मटलीं जातात् दादाबाबाहीं २ ह्मटलीं जातात् अेक दुणें २ बे दुणें ४ अेकचोक ४ मिळून हिशेब ताळा थोह्यांकडून मिळाला. त्या बरोबर गवयी बावांनीं अुठून पाय धरिले. मी० हें काय गवयी० अेवढ्या वयांत आजच कांटा पाहिला आणि तो बिन सुलाख. येथें पासंगाची गोष्ट बोलणें ह्म० आपलें अज्ञान लोकाला दाखवणें आणि आपण गाजर पारखी अहों असे लोकांस दाखवणें याहून जास्त कांहीं नाहीं.

प्रत्यक्ष अनुभव सिद्ध गोष्टीला दूषण लावणें हें तर महत्पाप आहे. मी तर खूष झालों आणीक अेखादी चीज आपण जाणता काय. कारण माल जो दाखवलात या वरून वरीच माहिती असावी असें वाटतें. भिक्षुकांस यांतलें कांहींच माहीत नसतें तेव्हां कांहीं परवा जाचे बोल माहीत असावे. अेवढें खोदून विचारतां त्या करितां थोडें बहुत दाखवतों पण आपण विचारलें तें कांहीं नाहीं पण.

दा जाचे कितीक बोल आहेत ५०० बवबबंत
तर कांहींच जाणत नाहीं पण १२ टाळ्यांत ५ ह-
जार आहेत ते मात्र मुखोद्गत आहेत् त्या पैकीं
नमुन्या करितां २५ दास्वबतों असें १२ टाळ्या
वाजवल्या हा १ पुनः १२ वाजवल्या हे २ पुनः
१२ वा. हे ३ आतां असें करा फक्त मोजा असें
ह्मणून पुनः पुनः वाजवले असे पंचवीस वेळां
वाजवले मोजतां कांहीं आलें नाहींत असें भिन्न
भिन्न दर खेपेस १२ कमी नाहीं जास्त नाहीं ५०००
प्रकार ऐकणे असल्यास तितके वेळ बसा. आणि
परिक्षा घ्या आणि जा टाळ्या मारल्या त्याच्यामा-
त्रा किती झाल्या हें सांगा माझा जवळ त्याचा हि
शेब आहे या मात्रांचा ध्यानाला धरून मिनिटें
किती झालीं त्याचा हिशेब मी देईन. गव० ऐ-
वढी माहिती ह्मला नाहीं हें मी मघाचाच तालां-
त जाणलें ह्मणून खोदून विचारिलें मृदंगाचीप्र-
तिष्ठा याचा पुढें नाहीं या मात्रांची माहिती शें-
कडों विद्वानानां नाहीं. संहितेंत ह्म० ऋग्वेद ३
मात्रांचीं उदा० ३ च आहेत अधः स्विदासी
दुपरि स्विदासीत् नत्वाभीरिव विंदती ३ याशिवा-
य ४ मात्राचीं लारवां आहेत १ त्यांजवर अंकडे
नाहींत् या तिहीं वरच तिहींचे अंकडे आहेत् प-
रंतु हे कां दिले आहेत याचा विचार कोणी आ-

मचे वैदीक करीत नाहींत् दोन्हीं शाखेचे वीस२५ मात्र ह्मणतात् त्यांत मोठ्या पोटाचे जिंकतात त्यांचा दम संपे पर्यंत लांबवतात् त्यांची समजूत अशी झाली आहे जास्ती लांबवील तो शिष्ट मला तीन दम घेतले तरी पुरे पडत नाहीं तेव्हां मी थांबून रहातों जेथें तेथें माझी फजिती. ह्मणून मी शास्त्र काढून पाहिलें. नो ३ मात्रा हें लोकाला समजावें ह्मणून हा निबंध लिहीत आहें. नासदासीन्नोसदासीत् या वर्गात् बरेच आसीत् शब्द आले आहेत् त्यांत ५ नंबरचा नमृत्युरासीदमृतं० हा२ मात्रा आणि १० नंबर खालची दासी ३ व ११ नंबर वरची दासी ३ हे २ त्रिमात्र याहून जे राहिले ८आठ ते सर्व चतुर्मात्र समजावे यांत काय ठरलें. नासदासी न्नोसदासीत्० हे जे २ आसीत् आहेत् त्यांचीजी लांबी ह्मणतां त्यांत चवथा हिस्सा कमी करा. ह्म० त्याचाहून अरखूड करा हें ऐकतांच. सर्व विद्वान् रागावले आणि ह्मणाले तुह्मीं आमचीं सर्वांची नाकें कापलींत् असें पहा आह्मी आज पर्यंत अभ्यास करून करून दम वाढवला आणि आज हें काय अरिष्ट उद्भवलें एकदम घाला पडला इतक्यांत एकजण उठले आणि पाशुपतास्त्र सोडलें मी त्याचें निवारण करतोंआहें इतक्यांत एक वृध्द विद्वान् उभे राहिले आ

णि त्यांनीं मोठ्या जोरानें ब्रह्मास्त्र सोडलें मीलाग-
लीच साष्टांग नमस्कार घातला तेह्वां ते कांहीं वेळानें
शमलें मगमी०- महाराज यांत माझाकडे अपराध
काय आपण अनन्वित करतां तें नकरावें ह्मणून
शास्त्र मर्यादा आपणा पुढें मांडली यांत माझ्याक-
ल्पनेचें कांहीं १ नाहीं मात्रा ह्म० काय- कांहीं १ नि-
यमित काळ तो कसा. त्याचें प्रमाण शार्दूळ विक्री
डित छंदाचा १ श्लोक ह्मणण्यास जो काळ लाग-
तो तें १ पळ समजावें शास्त्री० याला प्रमाण का-
य. सिंधु. असे मतलबसिंधू अह्मी मानीत नाहीं,
कांतर अेका पळांत ५ श्लोक ह्मणूं नाहीं तर अे-
का श्लोकाला ५ पळें लागूं हें आमच्या हतांत आ-
हे. अु० आह्मीं रुद्राचें अवर्तन अेक कलाक ला-
वतों नाहींतर अेक अवर्तन ३ मिनुटांत ह्मणतों
मी० हीं दोन्ही विधानें अशास्त्र आहेत् शास्त्री०-
तुम्ही रुद्राचे अवरतनाला शास्त्र दाखवाल असें
आज पर्यंत कोठें अैकलें नाहीं. पण लेखी दाख-
वाल तर अह्मी मानूं. अनुभवीक नको. मी० अ-
शा लेखी दाखवूं. मतलब सिंधूंतलें नको. धर्म सिंधू-
तलें चालेल का. शास्त्री ह्म०- चालेल. कोठें आहे.
मी०- बायकांच्या मुंजीचा आसपास मागें किंवा
पुढें नक्की यावेळीं सांगतां येणार नाहीं. पण का-
ढून दाखवीन. अथवा लग्नाचा विषयांत असेल.

